cmyk

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com | नवी दिशा... नवे विचार..... | email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–१६७ | सोमवार, दि.१३ ऑक्टोबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### नोव्हेंबरमध्ये राजकिय उलथापालथ होईल–राऊत

मुंबईः महाराष्ट्राच्या राजकारणात नोव्हेंबर महिन्यात उलाथापालथ होईल. सर्वोच्च न्यायालयात शिवसेना पक्षाचे नाव आणि चिन्हाबाबत खटला सुरु आहे. आम्हाला न्यायदेवता न्याय देईल आणि तो जर न्याय मिळाला तर राज्याच्या राजकारणात उलथापालथ होईल, असा दावा शिवसेना (उबाठा) खासदार संजय राऊत यांनी केला आहे. संजय राऊत म्हणाले, दिल्लीमध्ये उलथापालथ करण्याची क्षमता महाराष्ट्राच्या नेतृत्वात पूर्वी होती, आता ती नाही. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बारामतीमध्ये निवडणुका जिंकण्यासाठी गैरप्रकार केल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. रात्री पोलिसांच्या वाहनातून पैसे कसे वाटले गेले, याच्यावर देखील चर्चा झाली पाहिजे. या चर्चेत अजित पवार, देवेंद्र फडणवीस यांनी सहभागी झाले पाहिजे. जर या चर्चेत ते सहभागी झाले तर संविधान लोकशाही अधिक बळकट होईल, असे ते म्हणाले.

### आंबेडकरांशी युती करायला उत्सूक–आठवले

मुंबई : आगामी स्थानिक स्वराज्य संस्था आणि महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी ठाकरे बंधूंच्या भेटींना पाठिंबा देताना स्वतःच्या आणि वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांच्यातील संभाव्य एकजुटीबाबत मोठे विधान केले. आठवले म्हणाले, ''ऐक्य हा सर्वांच्याच आवडीचा विषय आहे. ठाकरे बंधूंच्या भेटीगाठी जशा वाढत आहेत, तशाच माझ्या आणि प्रकाश आंबेडकर यांच्याही भेटी व्हाव्यात, अशी माझी इच्छा आहे. रिपब्लिकन ऐक्यासाठी आम्ही सकारात्मक आहोत. प्रकाश आंबेडकरांनी नेतृत्व करावे, पण त्यासाठी आमच्या भेटी वाढायला हव्यात. रामदास आठवले यांनी व्यक्त केलेली प्रकाश आंबेडकर यांच्यासोबतच्या ऐक्याची इच्छा ही रिपब्लिकन गटांमधील एकजुटीच्या दिशेनेही महत्त्वपूर्ण पाऊल ठरू शकते.

### मुलींना रात्री बाहेर पडण्याची परवानगी नकोच

कोलकात्ताः पश्चिम बंगालच्या दुर्गापूर येथे वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनीवर सामूहिक बलात्कार करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. खासगी वैद्यकीय महाविद्यालयाच्या परिसरात झालेल्या या घटनेवर प. बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी मौन सोडले आहे. मात्र यावेळी त्यांनी केलेल्या वक्तव्यावर सर्व स्तरातून टीका केली जात आहे. मुलींना रात्री बाहेर पडण्याची परवानगी नसली पाहिजे, असे ममता बॅनर्जी म्हणाल्या आहेत. तसेच त्यांच्या सरकारला या प्रकरणात ओढणे अन्यायकारक आहे, कारण पीडितेच्या सुरक्षेची काळजी घेण्याची जबाबदारी ही खासगी वैद्यकीय महाविद्यालयाची होती, असेही त्या म्हणाल्या आहेत. ममता बॅनर्जी यांनी पीडिता मध्यरात्रीच्या सुमारास कॉलेज कॅम्पसच्या बाहेर गेल्यावरून प्रश्न उपस्थित केला आहे.

### सुरतमध्ये १०० कोटींची सायबर फसवणूक

सुरतः सक्तवसुली संचालनालय (ईडी) पथकाने एका मोठ्या सायबर फसवणूक आणि मनी लॉंड्रिंग प्रकरणात चार आरोपींना अटक केली आहे. तपासात असे आढळून आले की, या आरोपींनी सायबर फसवणुकीद्वारे लोकांची फसवणूक करून १०० कोटी रुपयांहून अधिक बेकायदेशीर पैसे जमवले. सुरत पोलिसांच्या विशेष ऑपरेशन्स ग्रुपने दाखल केलेल्या एफआयआरच्या आधारे ईडीने या प्रकरणाचा तपास सुरू केला. आरोपी मकबूल डॉक्टर, त्यांचे मुलगे काशिफ आणि बसम मकबूल यांनी त्यांचे साथीदार महेश देसाई यांच्यासह विविध सायबर फसवणुकींमध्ये लोकांना फसवले, ज्यात डिजिटल अटक, फॉरेक्स ट्रेडिंग आणि बनावट ईडी आणि सर्वोच्च न्यायालयाच्या नोटिसांचा समावेश होता. अनेक लोक ऑनलाइन फसवणुकीचे बळी ठरले.

### आ.संग्राम जगतापांचे पुन्हा वादग्रस्त विधान

अहिल्यानगरः राष्ट्रवादी कॉंग्रेसचे आमदार संग्राम जगताप यांची मुस्लिम विरोधी वक्तव्यांची धार थांबत नाही. अहिल्यानगरमधील शिवशक्ती–भीमशक्ती जनआक्रोश मोर्च्यात त्यांनी पुन्हा धक्कादायक विधान केले. ''आपल्याला हा देश आणि धर्म सुरक्षित ठेवायचा आहे. त्यासाठी आपले दोन–चार लोक आत गेले तरी हरकत नाही, पण आता या लोकांना प्रत्युत्तर द्या,'' असा इशारा देत जगताप यांनी मुस्लिम समुदायाला लक्ष्य केले. या वक्तव्याने पक्षात अस्वस्थता पसरली असून, अजित पवारांनी कठोर भूमिका घेतली आहे. अहिल्यानगरमध्ये काही दिवसांपूर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याजवळ आक्षेपार्ह पत्रक भिरकावले गेले होते. यानिमित्त शिवशक्ती–भीमशक्ती जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला, यात संग्राम जगताप आणि भाजप आमदार गोपीचंद पडळकर सामील झाले.

# अतिवृष्टीचा शेतकऱ्यांना धक्का

## कडधान्य उत्पादनात मोठी घट, डाळींच्या दरात वाढ होण्याची शक्यता

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यात झालेल्या अतिवृष्टीने शेतकऱ्यांची शेती अक्षरशः खरडून टाकली आहे. यामुळे खरीप हंगामातील कडधान्य पिकांचे अतोनात नुकसान झाल्याने उत्पादन घटले आहे. यामुळे शेतकऱ्यांना मोठा धक्का बसला असून, याशिवाय आगामी काही दिवसांत मूग, उडीद, हरभरा आणि मटकीच्या दरांचा भडका उडण्याची भीती व्यक्त केली जात आहे.**



राज्यातील अनेक भागांत सप्टेंबरअखेर झालेल्या जोरदार पावसामुळे खरीप हंगामातील पिके वाहून गेली. विशेषतः मूग, उडीद आणि तूर पिके पूर्णपणे मातीने गाडली गेली किंवा शेंगा मोडून जागेवरच खराब झाल्या. पोळ्यानंतर पावसाने जोर पकडल्याने तोडणीस आलेली कडधान्य पिके वाहून गेली. काही शेतात माती, दगड, गोटेच उरले असल्याचे स्थानिक शेतकरी सांगतात. या पिकांचे नुकसान झाल्यामुळे उत्पादनात मोठी घट झाली असून, बाजारात डाळींची आवक कमी होत आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत मटकीच्या दरात २५–३० टक्के वाढ झाली आहे. मटकीला

▶▶ पान २ वर

### योग्य शासकिय धोरणाची गरज

हवामानातील बदलामुळे राज्यातील कृषी विभागासमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्याची प्रक्रिया सुरू असली तरी पिकांची हानी आणि भाववाढ रोखण्यासाठी शासनाकडून योग्य धोरणाची गरज आहे. अतिवृष्टीने राज्यातील कडधान्य पिकांचे नुकसान झाले असून, बाजारात डाळींची आवक कमी झाली आहे. परिणामी, मूग, उडीद, मटकी आणि हरभरा यांच्या दरांचा भडका उडण्याची शक्यता वाढली आहे. शेतकऱ्यांसाठी हा हंगाम तोट्याचा ठरत असतानाच ग्राहकांनाही वाढत्या महागाईचा सामना करावा लागणार आहे. यासाठी शासनाने मध्यम मार्ग काढून शेतकऱ्यांसह ग्राहकांना दिलासा देण्याची गरज आहे.

# शरद पवार गट स्थानिक निवडणुका स्वबळावर लढणार

## सुप्रिया सुळे यांचे संकेत



नागपूर। प्रतिनिधी

**राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांत स्वबळावर उतरण्याचे ठोस संकेत दिले आहेत. महायुती काय करणार हा त्यांचा विषय, आम्ही काय करणार हा आमचा अधिकार आहे, असे सुप्रिया सुळे म्हणाल्या.**

सुप्रिया सुळे म्हणाल्या, राज्यात कॉंग्रेस आणि राष्ट्रवादीने १८ वर्षे सत्तेत राहून राज्य केले. पण स्थानिक निवडणुका आम्ही नेहमी स्वतंत्र लढलो आहोत. मागच्या वर्षी शिवसेना आणि भाजपही वेगवेगळे लढले होते. शेवटी या निवडणुका कार्यकर्त्यांच्या ताकदीवर अवलंबून असतात. महायुतीच्या निर्णयावर भाष्य करत त्या पुढे म्हणाल्या, ''महायुतीने काय करायचे हा त्यांचा विषय आहे, तो मुख्यमंत्र्यांचा अधिकार आहे. आम्ही काय करणार तो आमचा अधिकार आहे. पुढच्या काळात त्या सगळ्या गोष्टी स्पष्टपणे दिसून येतील. भाजपच्या बदलत्या स्वरूपावर बोलताना सुळे यांनी संसदेतील

▶▶ पान २ वर

## कारागृह अधीक्षकाची चौकशी दरम्यान

# दोन अधिकाऱ्यात शाब्दिक खडाजंगी

बीड । प्रतिनिधी

करागृहातील कैद्यांना पैशाचे अमिष आणि धर्मांतर या संदर्भात वादग्रस्त ठरलेले कारागृह अधीक्षक पेट्रस गायकवाड यांची गृह विभागाकडून पाच तास चौकशी करण्यात आली, मात्र या चौकशी दरम्यान दोन अधिकाऱ्यांमध्ये शाब्दिक खड जंगी झाल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

जिल्हा कारागृहामध्ये बंदिस्त असलेल्या कैद्यावर दबाव टाकून त्यांचे धर्मांतर करण्यासाठी प्रयत्न केल्याचा गंभीर आरोप कारागृह अधीक्षक



पेट्रस गायकवाड यांच्यावर झाल्याने मोठी खळबळ उडाली आहे. कारागृहामध्ये सुरू असलेले भजन, पूजा अर्चा देखील बंद करण्यात आल्याचे आता पुढे येत आहे.

▶▶ पान २ वर

# लोणी सय्यदमीर मध्ये शेतकऱ्यांचा खून

आष्टी । प्रतिनिधी

तालुक्यातील अंभोरा पोलीस ठाणे हद्दीतील लोणी सय्यदमीर येथे शेतीच्या वादातून झालेल्या भांडणात एकाचा खून झाल्याची घटना शनिवारी घडली. छबु देवकर (वय–७२) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. तर मयताचा मुलगा मिठू देवकर हा गंभीर जखमी झाला आहे.

आष्टी तालुक्यातील सय्यदमीर लोणी येथे देवकर कुटुंबामध्ये गेल्या अनेक दिवसापासून जमिनीचा वाद वाद सुरू आहे. त्यातच शनिवारी सायंकाळच्या सुमारास लहान मुले चेंडू खेळण्याच्या वादातून हा वाद पुन्हा उफाळला. या वादाचे रूपांतर मारामारीत झाले या मारामारी मध्ये छबू देवकर यांना गंभीर मार लागला असता त्यांना अहिल्यानगर येथे पुढील उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. मात्र त्यांना गंभीर मार लागल्याने डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. दरम्यान आंभोरा पोलीस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक मंगेश साळवे यांना घटनेची माहिती मिळताच त्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन परिस्थितीचा आढावा घेत तपासाची चक्रे फिरवत दोन टीम तयार

▶▶ पान २ वर

# खोक्या उर्फ सतीश भोसलेच्या कुटुंबावर हल्ला

शिरूर । प्रतिनिधी



काही दिवांपूर्वी आ. सुरेश धस यांचा निकटवर्तीय मानला जाणारा सतीश उर्फ खोक्या भोसले चर्चेत आला होता. आता त्याच्याच कुटुंबावर मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात टोळक्याने प्राणघातक हल्ला केला असल्याची घटना उघडकीस आली आहे. या हल्ल्यात चार महिला गंभीर जखमी झाल्या असून, एका महिलाची प्रकृती गंभीर असल्याची माहिती समोर आली आहे. ही धक्कादायक घटना शिरूर तालुक्यातील तहसील कार्यालयाजवळील गायरानमध्ये घडली.

महिलांनी जीव वाचवण्यासाठी आरडाओरडा केला, मदतीसाठी किंकाळ्या फोडल्या, पण टोळक्याने मारहाण सुरुच ठेवली. थेट डोक्यावर, पाठीत आणि पायांवर वार करण्यात आले. या मारहाणीत सर्व महिला रक्तबंबाळ झाल्या. जखमी महिलांनी कसाबसा पोलीस ठाण्याचा रस्ता धरला आणि शिरूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी तातडीने कारवाई करत जखमींना बीडच्या शासकीय जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केलं असून सध्या तिथेच त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. या हल्ल्यात चार महिला गंभीर जखमी झाल्या असून, एका

▶▶ पान २ वर

# बिहारमध्ये एनडीएचे जागावाटप ठरले

## भाजप आणि नितीश कुमार समसमान जागा लढवणार

पाटणा । वृत्तसंस्था

बिहार विधानसभा निवडणुकीसाठी राष्ट्रीय लोकशाही आघाडीने जागावाटपाचा फॉर्म्युला निश्चित केला आहे. भाजप आणि जनता दल युनायटेड प्रत्येकी १०१ जागांवर उमेदवार उतरवणार आहेत. तर चिराग पासवान यांच्या लोक जनशक्ती पक्षाला २९ जागा देण्यात आल्या आहेत. याशिवाय, जीतन राम मांझी यांच्या हिंदुस्तानी अवाम मोर्चाला आणि



राष्ट्रीय लोक मोर्चाला प्रत्येकी ६ जागा मिळाल्या आहेत.

भाजपचे बिहार प्रभारी विनोद तावडे यांनी सांगितले की, एनडीएतील सर्व घटकांनी परस्पर सहमती आणि मैत्रीपूर्ण वातावरणात जागांचे वितरण पूर्ण केले आहे. त्यामुळे आगामी निवडणुकीत

▶▶ पान २ वर

# दिवाळीच्या तोंडावर एसटी कर्मचाऱ्यांचे आंदोलन

मुंबई । प्रतिनिधी

**एसटी कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित थकीत ४ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम मिळावी यासाठी वेगवेगळ्या १८ संघटनांच्या महाराष्ट्र एसटी कामगार संघटना कृती समितीने आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. सोमवारपासून आझाद मैदानावर धरणे आंदोलन सुरू होणार असून, आर्थिक मागण्यांवर कायमस्वरूपी तोडगा निघाल्याशिवाय आंदोलन मागे घेण्यात येणार नाही, असा स्पष्ट इशारा महाराष्ट्र एसटी कामगार संघटना कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.**



यासंदर्भात रविवारी कृती समिती मधील सर्व श्रमिक संघटनांची बैठक मुंबईत पार पडली. त्यामध्ये आंदोलनावर ठाम राहण्याचा निर्णय घेण्यात आला. या बैठकीला कृती समिती मधील हणमंत ताटे, श्रीरंग बरगे, संदीप शिंदे, हिरेन रेडकर, पांडुरंग वाघमारे, दादाराव डोंगरे, बंडू फड, संतोष गायकवाड, राजेंद्र मोजाड, विनोद गजभिये, अरुण वीरकर, गौतम कांबळे, विश्वनाथ जाधव आदी पदाधिकारी उपस्थित होते.

▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.११ ऑक्टोबर २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| पीक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ७४.५० क्विंटल | २,३५० | २,६९१ | २,५३८ |
| ज्वारी/हायब्रिड: १०४.०० क्विंटल | २,००० | ३,१५१ | २,३६७ |
| मका/लोकल:२३.०० क्विंटल | १,६०१ | १,६०१ | १,६०१ |
| तूर : १.५० क्विंटल | ६,१२५ | ६,१२५ | ६,१२५ |
| उडीद : १.०० क्विंटल | ४,००० | ४,००० | ४,००० |
| बाजरी: ११७.०० क्विंटल | २,००० | २,८८१ | २,५५५ |
| मुग: ७.०० क्विंटल | २,५०० | ४,५०० | ३,४८० |
| सोयाबीन: ४८८.०० क्विंटल | ३,१७० | ४,०२५ | ३,६९५ |
| हरभरा: २.५० क्विंटल | ५,१३१ | ५,१३१ | ५,१३१ |

# एका झटक्यात २० हजार कर्मचाऱ्यांची कपात!

## आयटी क्षेत्रात खळबळ




नवी दिल्ली । वृत्तसंस्था

भारतातील सर्वात मोठी आयटी निर्यातदार कंपनी आणि खासगी क्षेत्रातील सर्वाधिक रोजगार देणारी टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसने आपल्या इतिहासातील सर्वात मोठी कर्मचारी कपात केली आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वाढता प्रभाव आणि अमेरिका–भारत व्यापार संबंधांतील तणाव यामुळे

▶▶ पान २ वर

### जागतिक परिस्थितीने गुंतवणूकदार चिंतेत...

विश्लेषकांनी नमूद केले की, ही नोकरकपात मंद व्यावसायिक दृष्टिकोन दर्शवते. जागतिक मागणीतील कमतरता आणि तंत्रज्ञान बजेटमधील कपात यामुळे हा निर्णय घेण्यात आला. नोकरकपातीमुळे आलेल्या एकवेळच्या खर्चामुळे टीसीएसचा तिमाही नफा अपेक्षेपेक्षा कमी आला. विश्लेषकांच्या मते, या कपातीमुळे भारतातील सर्वात स्थिर तंत्रज्ञान कंपनीलाही बदलत्या डिजिटल अर्थव्यवस्थेची झळ जाणवत आहे.



# राज ठाकरे स्नेहभोजनासाठी मातोश्रीवर

मुंबई । प्रतिनिधी

महापालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुंबईत मोठ्या घडामोडी घडताना दिसत आहेत. मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे हे रविवारी सहकुटुंब मातोश्रीवर पोहोचले. स्नेहभोजनासाठी ही भेट झाल्याचे सांगण्यात येत असले तरी राज आणि उद्धव ठाकरे यांच्यामध्ये तब्बल पावणे तीन तास चर्चा झाल्याची माहिती आहे. त्यामुळे मनसे आणि शिवसेना

▶▶ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# देशाची अन् लोकशाहीची अब्रू जातेय !

सरन्यायाधीश बी. आर. गवई यांच्याबाबत घडलेला प्रकार अत्यंत लाजीरवाणा होता. त्यात काय कारवाई करायची ती करून त्याचा सोक्षमोक्ष लावणे योग्य राहील. तसेच व्हायला हवे आणि या ओंगळ प्रकारची चर्चा थांबवायला हवी. कोळसा कितीही उगाळला तरी तो काळाच असतो हे माहिती असूनही तो उगाळण्यात जी धन्यता मानली जाते आहे ती अनाकलनीय आहे. झालेल्या घटनेच्या मुळाशी जाऊन तेथे शस्त्रक्रिया करणे अत्यावश्यक आहे व त्याकडे लक्ष द्यायला हवे. हल्ल्याचा प्रयत्न करण्याची कृती अचानक घडली असे भासत असले तरी कोणतीही कृती अचानक होत नसते. त्यासाठी अगोदर एक मैदान तयार केले जाते अन् त्याला एक पार्श्वभूमी असते. ही तयारी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष अशा दोन्ही स्वरूपाची असू शकते. त्यातूनच मते तयार केली जातात, बिघडवली जातात. कानात आणि मनात विष ओतले जाते. याचाच परिपाक म्हणून अनियंत्रित झालेली एखादी व्यक्ती असे काहीसे कृत्य करण्यास धजावते जे सरन्यायाधीशांच्या बाबतीत घडले. खरी समस्या आहे तिथेच. या विखारी विचारपेरणीला रोखणेच महत्त्वाचे. ते न केल्यास भविष्यात अशा वारंवार मान खाली घालायला लावणार्या घटना होत राहतील. समाज माध्यमांच्या संदर्भात केवळ न्या. गवई यांनीच नाही तर विविध न्यायालयांच्या न्यायाधीशांनी वेळोवेळी धोक्याचे इशारे दिले आहेत.

एखाद्या प्रकरणाच्या सुनावणीच्या वेळी याचिका दाखल करताना याचिकाकर्त्याचा त्याने ज्या उद्देशाने ती याचिका दाखल केली आहे तोच उद्देश असतो असे नाही. बऱ्याचदा अंतस्थ हेतू वेगळे असतात आणि न्यायासनावर बसलेल्या व्यक्तींपासून ते लपून राहू शकत नाही. त्यावर ते प्रखर टिप्पणी करतात, प्रसंगी दंडही ठोठावतात. संबंधित याचिकाकर्त्याला अगदी तेच हवे असते कारण त्याने खरेच जनहितासाठी याचिका केली असेल तर तिची फारशी चर्चा होणारही नाही. त्याने जर प्रसिद्धीच्या हेतूने किंवा कोणाला लक्ष्य करण्यासाठी याचिका दाखल केली असेल तर त्याच्यावर त्याला अपेक्षित अशी शेरेबाजी उमटली तर त्याचाच हेतू साध्य होतो. खुद्द गवई यांनीही याबाबत भाष्य केले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, न्यायाधीश जे तोंडी बोलतात त्याचा न्यायालयाच्या बाहेर आणि समाजमाध्यमांवर काय अर्थ काढला जाईल याची काहीच शाश्वती नसते. एका प्रकरणात आपणच आपल्या सहकारी न्यायाधीशांना टिप्पणी करण्यापासून रोखले होते. त्याचे कारणच हे होते की त्या टिप्पणीचा अनर्थ काढून नव्या वादाला तोंड फुटले असते. स्वत: गवई यांच्याबाबतीत मात्र नेमके तसेच झाले जे टाळण्याची ते खबरदारी घेतात. गवई प्रकरण ताजे असल्यामुळे त्याची चर्चा होते आहे. निर्लज्जपणाचा कळस म्हणजे अत्यंत लांच्छनास्पद घटना घडूनही त्यावर संबंधित अनियंत्रित माध्यमांवर कोणताही मुलाहिजा न बाळगता सविस्तर चर्चा घडवून आणल्या जात आहेत आणि माथी भडकावण्याचे काम सुरूच आहे. कुठे जाती शोधण्याचा प्रयत्न होतोय तर कुठे विचारधारा आणि तिचे कुळ आणि मुळापर्यंत जाण्याचा प्रकार सुरू आहे.

सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे गवईंच्यावर हल्ल्याचा प्रयत्न मुळात अशाच विखारी अपप्रचार आणि सामग्रीतूनच उत्पन्न झाला. आपला देश मोठा आहे, असंख्य हातात स्मार्ट फोन आहेत. अगदी नेमकेपणाने सांगायचे झाले तर ८० ते ९० कोटी लोकांकडे ते असावेत. त्यावर अव्याहतपणे मजकुराची त्सुनामी सुरू आहे. काही पापभिरू लोक शुभेच्छा संदेशासाठी आणि व्यक्तिगत मनोरंजनासाठी या माध्यमाचा वापर करतात. तथापि, मोठा वर्ग किंवा गट असा आहे की तो त्यांच्या स्वत:च्या नकळत त्यांच्या वापरकर्त्यांच्या हातचे बाहुले बनला आहे. न्या. गवई पदावर आल्यापासून त्यांनी संविधानाच्या संदर्भात विधाने केली. जी केली ती संविधानाच्या चौकटीत केली आणि संविधानाच्या बलस्थानांची साक्ष देणारी केली. देशातल्या विविध माध्यमांत आणि कार्यक्रमातच नव्हे तर परदेशातही त्यांनी केली. त्यांची हीच भूमिका त्यांच्या अलीकडच्या निवाड्यांमध्येही दिसली. हा देश संविधानाच्या चौकटीनुसारच चालतो हे त्यांचे परदेशातील भूमीवर केलेले विधान लक्षवेधी ठरले. त्यांचे पूर्वसुरी न्या. डी. वाय. चंद्रचूडही बऱ्याच कार्यक्रमांत आणि मंचांवर बोलायचे. दोन्ही न्यायाधीश जे बोलले ते कायद्याला धरून आणि संविधानाच्या चौकटीतच. मात्र विटंबना अशी की चंद्रचूड यांनाही लक्ष्य करणारे कथित विचारवंत वेगळे होते अन् आता गवई यांना लक्ष्य करणारे वेगळे. त्यात उजवे-डावे आणि सगळ्याच रंगांचे लोक आपापल्या वकुब आणि सोयीनुसार भूमिका घेत बेबंदपणे आपले विचार मांडते झाले. केवळ न्यायाधीशच नव्हेत, तर साहित्यिक आणि राजकीय मंडळी सगळेच या मीडिया ट्रायलला सातत्याने सामोरे जात आहेत. निवडणूक आयोगापासून ते संसदेपर्यंत आणि विरोधी पक्षनेत्यापासून पंतप्रधानांपर्यंत प्रत्येक घटनात्मक संस्था अथवा घटनात्मक पदावरील व्यक्ती या अशाच निरंकुश शाब्दिक हल्ल्यांना बळी ठरले आहे. हे हल्ले केवळ सोशल मीडियातील फिरवाफिरवीपर्यंत असते तर तेही एकवेळ चालण्यासारखे होते. मात्र त्यातून असंख्य लोकांची जी मने कलुषित केली जात आहेत ते घातक असून त्यातून भविष्यात अशा स्वरूपाच्या चीड आणणाऱ्या आणि मान खाली घालायला लावणाऱ्या घटना घडतच राहतील. अत्यंत व्यक्तिगत स्वरूपाचे हल्ले, अत्यंत आक्षेपार्ह टीका आणि टिप्पणी, शिवीगाळ आणि चारित्र्यहनन, इतिहासातील थोर नेत्यांचेही प्रतिमाभंजन आणि किळस वाटावा असा त्यांच्याबद्दल आणि त्यांच्या कुटुंबाबद्दलचा घाणेरडा प्रचार राजरोस सुरू आहे. माध्यमांवर परस्परविरोधी विचारांचे गट परस्परांवर तुटून पडत असले तरी त्यात अब्रू जातेय ती देशाची आणि लोकशाहीची. हे सगळे वेळीच रोखा म्हणायची वेळही आता गेली आहे. मात्र त्याचा बिमोड निश्चितच व्हायला हवा.

## ज्ञान आणि कल्पकतेचा संगम-गुरुकृपा महाविद्यालयात राज्यस्तरीय भित्तीपत्रक सादरीकरण स्पर्धा




**माजलगाव । प्रतिनिधी**

**फार्मसी विद्याशाखेमध्ये लोकप्रिय असलेल्या राज्यस्तरीय भित्तीपत्रक सादरीकरण (पोस्टर प्रेझेंटेशन) स्पर्धेचे आयोजन गुरुकृपा इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, माजलगाव महाविद्यालयात भव्य स्वरूपात करण्यात आले.या वेळी महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील फार्मसी कॉलेज मधील विद्यार्थ्यांनी यात सहभाग नोंदवला.**

या कार्यक्रमाचे उद्घाटन गुरुकृपा सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष डॉ.यशवंत राजेभोसले यांनी केले या कार्यक्रमासाठी ग्लेनमार्क फार्मास्युटिकल या नामांकित औषधी कंपनीचे मुख्य संशोधक वैज्ञानिक अलकेश कासलीवाल यांची खास प्रमुख उपस्थिती लाभली. भित्तीपत्रकाचे निरीक्षणे संपल्यानंतर येथे पारितोषिक वितरण समारंभ पार पडला यात डीफॉर्मसी आणि बीफार्मसी विभागात स्वतंत्र पाच हजार,तीन हजार, दोन हजार रोख व सन्मानचिन्ह बक्षीस देण्यात आले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक गुरुकृपाचे प्राचार्य अमित बिंदू यांनी केले तसेच संस्थेचे अध्यक्ष डॉ.यशवंत राजेभोसले यांनी मंचावरून सहभागी विद्यार्थ्यांशी संवाद साधला यावेळी पुरुषोत्तम करवा, सुभाष नाकलगावकर, हरीश यादव आदी पत्रकार उपस्थित होते.

## डॉ.संतोष कदम यांचा भव्य सन्मान समारोह यशस्वी संपन्न

**अंबाजोगाई प्रतिनिधी**

**दिनांक ११ ऑक्टोबर २०२५ रोजी मनस्विनी महिला प्रकल्प, अंबाजोगाई येथे, दुबई येथे संपन्न होणाऱ्या मास्टर्स आंतरराष्ट्रीय व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी डॉ.संतोष कदम यांची निवड झाली म्हणून डॉ.संतोष कदम सन्मान समितीच्या वतीने सन्मान समारोहाचे आयोजन करण्यात आले होते.**



समारोहाची अध्यक्षता सन्मान समितीच्या अध्यक्ष मा. डॉ.अरुंधती पाटील यांनी भूषविली. प्रमुख अतिथी म्हणून मा. चेतनाजी तिडके (अतिरिक्त पोलीस अधीक्षक, अंबाजोगाई), मा.विलासजी तरंगे (तहसीलदार, अंबाजोगाई), मा. डॉ.सिद्धेश्वरजी बिराजदार (स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय अंबाजोगाई), एडवोकेट अजित लोमटे (अध्यक्ष, वकील संघ,अंबाजोगाई), मा.अविनाशजी मुडेगावकर (पत्रकार, दैनिक लोकमत) मा.मंगलाजी लोखंडे (सेवानिवृत्त क्रीडा शिक्षिका), मा.डॉ. विवेकजी मुळे (मुळे हॉस्पिटल, अंबाजोगाई) मा.शिवकुमारजी निर्मळे (सेवानिवृत्त क्रीडा शिक्षक) मा.रमणजी सोनवलकर (सेवानिवृत्त क्रीडाशिक्षक) यांनी डॉ.संतोष कदम यांच्या प्रति शुभेच्छा पर मनोगत व्यक्त केले. प्रशासकीय कामाच्या व्यस्ततेतून मा. दीपकजी वजाळे (उपजिल्हाधिकारी,अंबाजोगाई) यांनी भ्रमणध्वनी वरून डॉ.संतोष कदम यांना शुभेच्छा दिल्या. समारोहाचे संचालन - राहुल मोरे प्रास्ताविक - ॲडव्होकेट बाळासाहेब लोमटे तर शेवटी कार्यक्रमाचे अध्यक्ष, प्रमुख अतिथी, मनस्विनी महिला प्रकल्प, तंत्रशुद्ध फोटोग्राफी व उपस्थितांचे सप्रेम आभार संयोजक - महेंद्र निकाळजे यांनी मानले. समारोह अतिशय उत्साहात संपन्न झाला यशस्वीतेसाठी सोहम योगा ग्रुपने तन-मन धनाचे योगदान दिले.

## जिल्ह्यानंतर विभागातही सोहम लांगोरेची 'चमकदार' कामगिरी

### राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी बीडमधून निवड..

**बीड । प्रतिनिधी**

**जिल्हास्तरीय स्पर्धेत 'पहिला' क्रमांक पटकावल्यानंतर, बीडचा सुपुत्र चि.सोहम अतुल लांगोरे याने विभागीय स्तरावरही आपल्या बुद्धिमत्तेची आणि कौशल्याची 'चमकदार' मोहोर उमटवली आहे.महाराष्ट्र युवक व क्रीडा संचालनालय व जिल्हा क्रीडा कार्यालय,बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय स्पर्धेत दैदिप्यमान यश मिळवल्यानंतर, चंपावती विद्यालयातील इयत्ता ९ वीत शिकणाऱ्या सोहमने शुक्रवार दि. १० ऑक्टोबर रोजी हिंगोली येथे पार पडलेल्या छत्रपती संभाजीनगर विभागीय बुद्धिबळ स्पर्धेत १७ वर्ष वयोगटात 'द्वितीय' क्रमांक पटकावून आपल्या तयारीची साक्ष दिली आहे.या स्पर्धेत छत्रपती संभाजीनगर,जालना, बीड, लातूर, परभणी, हिंगोली,नांदेड आणि धाराशीव या जिल्ह्यातील विजयी बुद्धिबळपटूंचा समवेश होता.या महत्त्वपूर्ण कामगिरीमुळे सोहमने थेट राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धेतील आपले स्थान दिमाखात निश्चित केले आहे.**

सोहम लांगोरे हा आंतरराष्ट्रीय 'फिडे' मानांकन (ऋखऊए ठरींशव) खेळाडू आहे. त्याचे 'फिडे रेटिंग' १६०० इतके प्रभावी आहे.बुद्धिबळ क्षेत्रातील सर्वोच्च समजल्या जाणाऱ्या 'ग्रँड मास्टर' किताबाच्या दिशेने त्याचा प्रवास सुरू आहे.त्याने अहिल्यानगर, सांगली,पुणे, संभाजीनगर, नाशिक,पाथर्डी, येडशी, धाराशिव,श्रीरामपूर आणि आळंदी यांसारख्या



विविध ठिकाणी झालेल्या आंतरराष्ट्रीय फिडे चेस स्पर्धांमध्ये अनेक पदके आणि रोख बक्षिसे जिंकून आपल्या बुद्धीचातुर्याची चुणूक दाखवली आहे. सोहमला बुद्धिबळ प्रशिक्षक श्री.दत्तात्रेय क्षीरसागर व रामप्रसाद शेंडगे सरांचे व बीड डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशनचे सचिव श्री.अशोक कागदे सरांचे बहुमोल मार्गदर्शन लाभत आहे.सोहमला त्याच्या आई वडिलांची देखील भक्कम साथ आहे.यापूर्वी इयत्ता पहिलीत असताना युवातर्फे घेण्यात आलेल्या 'मास्टर स्ट्रोक' चित्रकला स्पर्धेतही सोहमने मुंबईपर्यंत मजल मारत 'स्टेट विनर' चा बहुमान मिळवला होता.सध्या सोहमचे पूर्ण लक्ष्य आगामी राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धेवर केंद्रित झाले असून, तो कठोर सराव करत आहे.बीडच्या या युवा खेळाडूचे सर्वत्र अभिनंदन होत असून, तो राज्याच्या स्पर्धेतही चमकदार कामगिरी करेल,अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## पान ६ वरून...

### मा. जि. प सदस्य

काम कोणाचेही असू द्या अथवा पोलीस स्टेशनचे सर्व जबाबदारीचे काम असू द्या तात्यांनी कधी दुजाभाव न करता सर्वांचे कामे केली आहे. तात्या हे शिवप्रसाद खेडकर आणि चेतन खेडकर यांचे वडील होते.त्यांच्या पश्चात दोन मुले-सुना, चार मुली-जावई तसेच नातवंडे,पुतणे असा मोठा परिवार आहे . त्यांचा अंत्यविधी टाळ मृदंगाच्या गजरात दिनांक १२ऑक्टोबर २०२५ रविवारी सायंकाळी चारच्या सुमारास चकलांबा येथे करण्यात आला. तसेच त्यांच्या अंत्यविधीला चकलांबा आणि चकलांबा परिसरातून विविध क्षेत्रातून मोठा जनसमुदाय उपस्थित होता. तसेच उपस्थितांनी भावपूर्ण श्रद्धांजली वाहून आनंदात विलीन करून तात्यांना शेवटचा निरोप दिला. तात्याच्या जाण्याने सर्व चकलांबा आणि परिसरात शोककळा पसरली आहे.

----------

### जयभवानीच्या कार्यक्षेत्रातील

पंडित, व्हा. चेअरमन भाऊसाहेब नाटकर, बाजार समितीचे सभापती जगन्नाथ काळे, उपसभापती श्रीहरी पवार यांच्यासह संचालक सर्वश्री जगन्नाथ शिंदे, आप्पासाहेब गव्हाणे, सुनिल पाटील, श्रीराम आरगडे, राजेंद्र वारंगे, संदीपान दातखीळ, जगन्नाथ दिवाण, कुमारराव ढाकणे, शरद चव्हाण, भिमराव मोरे, रावसाहेब देशमुख, गणपत नाटकर, जगन्नाथ काळे, बाबुराव काकडे, रहेमतुल्ला पठाण, साहेबराव चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते.प्रारंभी ह.भ.प. महादेव महाराज आणि संचालक सुनील पाटील यांच्या हस्ते विधीवत पूजा करून उपस्थित मान्यवरांच्या हस्ते बॉयलर प्रदिपन करण्यात आले.

----------

### सावतामाळी मंदीर परिसरातील

कीर्तीनगर, कृष्णानगर, गंगासागर नगर, सिद्धेश्वर नगर सह सावतामाळी मंदिर परिसरातील सर्व अवैद्य धंदे तात्काळ कायमचे बंद करण्याची लेखी मागणी राजकुमार डाके यांच्या वतीने संभाजी नगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मा.धनंजय ढोणे साहेब यांच्याकडे करण्यात आली. या निवेदणावर सामाजीक कार्यकर्ते आनंत ईंगळे, योगेश पांडकर, बालासाहेब गायकवाड, भारत ताटे, दत्ता दहिवाळ, महेश बागवाले, सुरेश नानवटे, रामेश्वर फडकरी, अतूल माळी,काशिनाथ शंकुरवार, रविभाऊ मुळे, ऋशिकेश वानरे, वैजनाथ भोकरे, गणेश महाराज, आशोक महाराज, माधव वानरे, शिवाजी फड, नागनाथ मुंडे, जालींदर फड आदींच्या वतीने देण्यात आले.

----------

### पूर परिस्थितीच्या कार्यकाळात

विस्थापित नागरिकांची व्यवस्था, वीजपुरवठा आणि रस्ते वाहतूक यासंबंधी समन्वय साधण्यात आला. या काळात प्रशासनाने दाखवलेली संवेदनशीलता आणि तत्परता ही लोकसेवेचे आदर्श उदाहरण ठरली.स्थानिक नागरिकांनी प्रशासनाचे कौतुक करत, आपत्तीच्या काळातही अधिकारी व कर्मचारी जनतेसोबत खंबीरपणे उभे राहिले असे मत व्यक्त केले आहे.

-------------

### मुर्शदपुरमध्ये रोखला

आहे त्यामुळे आम्ही हा बाल विवाह करणार होतो त्यानंतर त्यांना मुलींच्या शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले तसेच मुलीला शिक्षणासाठी शासनाने कोणकोणत्या सुविधा दिलेल्या आहेत त्या संदर्भात माहिती दिली संत भगवान बाबा ऊसतोड कामगारांच्या मुला मुलींचे वस्तीग्रह याबाबतची माहिती देण्यात आली तसेच महिला बाल विकास विभागाच्या माध्यमातून मुलींच्या शिक्षणासाठी व सुरक्षेसाठी कोणकोणत्या योजना आहेत या संदर्भात माहिती देण्यात आली सर्व टीमने मिळून बालविवाह थांबवला व सदरील बालिकेला बालकल्याण समिती बीड यांच्यासमोर सादर करण्यात आले यावेळी श्रीमती आढाव एसबी ग्रामविकास अधिकारी मुर्शिदपूर तत्त्वशील कांबळे अधिकार मित्र जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड, -क्ढण चे एम एम रेडेकर, यूपी चौरे, प्रदीप येवले, बीड ग्रामीण पोलीस स्टेशनचे ए बी शिंदे, एफ.ए. पठाण, अदी उपस्थित होते

----------

### आ.धस यांच्या प्रयत्नाने

माणुसकीचा श्वास बनली आहे.आ. धस यांच्या जनतेसाठी, जनतेच्या मनातून या कार्यपद्धतीचा परिणाम म्हणून आज हजारो कुटुंबे आ.धस यांच्या नावाने कृतज्ञतेने स्मरण करतात. रुग्णसेवक विकास साळवे व दता हुले, सोमनाथ कोल्हे, अमर वाळवे,सुशील ढोले,प्रतिक काळे या टीमच्या माध्यमातून दर आठवड्याला शेकडो रुग्ण बरे होतात, रुग्णांना शासकीय मदतीसाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केली जाते, हॉस्पिटलपर्यंत पोहोचण्यासाठी सहकार्य दिलं जातं. विकास साळवे यांचे हे कार्य आज अनेक सामाजिक संघटनांसाठी आदर्शवत उदाहरण ठरत आहे. रुग्णसेवा हीच खरी देशसेवा हे वाक्य विकास साळवे यांनी केवळ उच्चारलेलं नाही, तर ते जगून दाखवलं आहे. त्यांच्या या सेवाभावी वृत्तीला आ. सुरेश धस यांचे प्रोत्साहन आणि आधार लाभत असून आज मराठवाड्यातील जनतेच्या आशेचा दीपस्तंभ बनली आहे.

----------

### पूरग्रस्तांच्या मदतीसाठी

प्रदेश संघटक),डॉ. उमेश जाधव (मराठवाडा विभाग प्रमुख),डॉ. अनिल दादा जगताप, सचिन मुळूक,स्वप्निल गलधर, अनुराधा पेडणेकर,डॉ. मेघा जोशी,डॉ. संदीप सालपे (जिल्हाध्यक्ष, बीड), आणि डॉ. ब्रह्मदेव खिल्लारे (उपजिल्हाप्रमुख) यांनी वैद्यकीय आणि सामाजिक जबाबदारीचे उत्तम उदाहरण घालून दिले.या शिबिरांचे सुयोग्य नियोजन, समन्वय आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी हे कार्य गेवराई तालुक्याचे प्रमुख उद्धव बापू मडके पाटील यांनी निष्ठेने व जबाबदारीने पार पाडले. पूरग्रस्त नागरिकांच्या डोळ्यात अश्रू होते, पण शिवसेनेच्या या वैद्यकीय सेवेने त्यांच्याच डोळ्यांमध्ये पुन्हा आशेचा किरण उजळला.लहान मुलांपासून वयोवृद्धांपर्यंत, तसेच पशुधनाच्या आरोग्याची जबाबदारीही या वैद्यकीय पथकाने मनापासून सांभाळली. डॉक्टरांनी रात्रंदिवस गावोगावी फिरून तपासणी केली, औषधे दिली आणि प्रत्येक रुग्णाला आधार दिला हीच खरी जनसेवा, हीच खरी शिवसेवा!पूरग्रस्त जनतेसाठी शिवसेना डॉक्टर सेलचा हा पुढाकार केवळ एक आरोग्य मोहिम नव्हे, तर एक जनसंपर्क, संवेदना आणि आशेचा उत्सव ठरला आहे.

----------

### दिंद्रुडच्या दक्षराज कटारेला

वर्षाखालील गटातील मुलांच्या संघात विविध स्पर्धेत सर्वोत्कृष्ट कामगिरी करत राज्यस्तरीय स्पर्धेसाठी लातुर येथे आयोजीत ५० मिटर बटरफ्लाय,४१०० मिटर फ्रिस्टाईल रिले,१९ वर्षाखालील वॉटर पोलो,४४०० मिडले रिले या जलतरण स्पर्धेसाठी दक्षराज पात्र ठरला आहे. दक्षराज कटारे यास मार्गदर्शन करणारे सिंदफणा पब्लिक स्कूल चे प्राचार्य शेख अन्वर, क्रीडा शिक्षक सचिन मंजुळे , दीपक माने , पुरुषोत्तम सोळंके, वैशाली सोळंके या सर्वांचे मार्गदर्शन लाभले, दिंद्रुड येथील डॉ. सोनाजीराव रांजवण माध्यमिक विद्यालय दिंद्रुड येथील क्रिडा शिक्षक ज्ञानोबा कटारे सर यांचा दक्षराज कटारे हा मुलगा आहे. त्याला जलतरणाचा अभ्यास व सराव देण्यासाठी ज्ञानोबा कटारे यांचा खारीचा वाटा आहे. त्याच्या या निवडीमुळे दिंद्रुड येथे त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## पान १ वरून...

### अतिवृष्टीचा शेतकऱ्यांना

सर्वाधिक दर मिळत असून, व्यापाऱ्यांच्या मते, आवक कमी झाल्याने पुढील आठवड्यात दर आणखी वाढू शकतात. दुसरीकडे खरीप हंगामात मोठ्या प्रमाणात कडधान्यांची पेरणी होते. मात्र, अतिवृष्टीमुळे जमीन वाहून गेल्याने शेत तयार नसल्याचे चित्र दिसत आहे. परिणामी रब्बी हंगामातील हरभरा आणि मसूर पिकांनाही फटका बसण्याची शक्यता आहे. याशिवाय कर्नाटक आणि मराठवाडा भागातून डाळींचा पुरवठा होत असला, तरी तेथेही पावसाने नुकसान केल्यामुळे बाजारातील उपलब्धता कमी होऊन दरात झपाट्याने वाढ होईल, अशी शक्यता आहे. शेतकऱ्यांना उत्पादन घट आणि जमिनीच्या हानीचा फटका बसला आहे. तर ग्राहकांना महागाईचा तडाखा बसणार आहे. अन्नधान्य आणि कडधान्याचे दर वाढल्याने स्वयंपाकघराचा खर्च वाढेल, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

------------

### कारागृह अधीक्षकाची

प्रामुख्याने गायकवाड यांनी जबरदस्तीने कैद्यावर धर्मांतरासाठी दबाव टाकत असल्याचा आरोप आमदार पडळकर यांनी केल्यामुळे राज्यात खळबळ उडाली होती. कारागृहात असलेले बंडू जाधव या आरोपीस काही महिन्यापूर्वी बेदम मारहाण झाल्याचेही समजते तो माजलगाव तालुक्यातील मोगरा येथील रहिवासी आहे. या संदर्भातील सहा नंबरच्या बॅरीकेटमध्ये सीसीटीव्ही मध्येही ही घटना कैद झाली आहे. या सोबतच मिनाबाई जगताप यांनी देखील आरोप केले आहेत की, तिचा पती एका प्रकरणात जेलमध्ये असल्याने त्याच्यावरही असाच दबाव असल्याचे मिनाबाई जगताप यांनी सांगितले. या सर्व प्रकरणाची चौकशी करण्यासाठी शनिवारी छत्रपती संभाजीनगर आणि पुणे येथील गृह विभागाच्या अधिकाऱ्यांनी थेट जिल्हा कारागृहात हजेरी लावली. तब्बल पाच तास चौकशी झाली, मात्र या चौकशी दरम्यान दोन अधिकाऱ्यांत चांगलीच शाब्दिक खडाजंगी झाल्याची चर्चा आहे. याची अधिकृत माहिती मिळू शकली नसली तरी सुत्राकडून असा प्रकार झाला असल्याचे समजते.

-------------

### शरद पवार गट स्थानिक

अनुभव कथन केला. भारतीय जनता पार्टीमध्ये आज ओरिजनल कोणी राहिलेला नाही. तुम्ही संसदेत एक नजर टाका, भाजपचे काँग्रेसीकरण झाले आहे. मी अटल बिहारी वाजपेयी, सुषमा स्वराज यांसारख्या नेत्यांना जवळून पाहिले आहे. सुषमाताई माझ्या गुरू आहेत. आम्ही संसदेत गेलो तेव्हा त्यांच्या भाषणावरून शिकलो. आज प्रचंड वेगळे वातावरण आहे. सुसंस्कृत पक्ष होता, तो आता राहिलेला नाही, असे त्या म्हणाल्या.

------------

### बिहारमध्ये एनडीएचे

एकजुटीने लढण्याचा निर्धार एनडीएने केला आहे. भाजप १०१ जागा,जदयू १०१ जागा, लोक जनशक्ती पक्ष (रामविलास) २९ जागा. राष्ट्रीय लोक मोर्चा ६ जागा, हिंदुस्तानी अवाम मोर्चा ६ जागा असे जागा वाटप झाले असल्याचे त्यांनी सांगितले. बिहारमधील आगामी निवडणुकीसाठी ही वाटणी परस्पर विश्वास आणि सन्मानाच्या वातावरणात करण्यात आली. तावडे यांनी स्पष्ट केले की, आम्ही एकत्रितपणे निवडणुकीत उतरून विकासाचा मुद्दा जनतेपर्यंत पोहोचवू.

----------

### खोक्या उर्फ सतीश

महिलाची प्रकृती गंभीर असल्याची माहिती समोर आली आहे. प्राथमिक माहितीनुसार, अनेक वेळा सांगून देखील या ठिकाणी का राहता? असे म्हणत टोळक्याने सतीश भोसलेच्या कुटुंबाला जबर मारहाण केल्याचे समजते. या घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. शिरूर पोलीस या संपूर्ण प्रकरणाचा तपास करत आहेत. आरोपींचा शोध घेण्याचे काम सुरू आहे. अनेक वेळा सांगून देखील या ठिकाणी का राहता?, असं म्हणत टोळक्याने सतीश भोसलेच्या कुटुंबाला जबर मारहाण केल्याचं समोर आलं आहे. या घटनेनंतर परिसरात भीतीचं वातावरण पसरलं आहे. शिरूर पोलीस या संपूर्ण प्रकरणाचा तपास करत आहेत.

-------------

### लोणी सय्यदमीर

करून रामदास देवकर, संतोष देवकर, राहुल देवकर, कविता देवकर, मनीषा देवकर, लता देवकर सर्व रा. लोणी सय्यदमीर (ता. आष्टी) यांना ताब्यात घेतले आहे. दरम्यान लोणी गावांमध्ये तणावपूर्ण शांतता असून परिस्थिती नियंत्रणात आहे. मयत छबू देवकर यांच्यावर लोणी येथे पोलीस बंदोबस्तात अंत्यसंस्कार करण्यात आले. सदरील गुन्ह्याचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक मंगेश साळवे करत आहेत.

-----------

### दिवाळीच्या तोंडावर एसटी

एसटीमधील महाराष्ट्र कामगार संघटना संयुक्त कृती समितीमधील १६ संघटना व अन्य एक महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेस या संघटनानी सोमवार दिनांक १३ ऑक्टोबर २०२५ पासून आंदोलनाची नोटीस दिली आहे. आता हे आंदोलन मुंबई सेंट्रल ऐवजी आझाद मैदानावर होणार आहे. दिवाळी तोंडावर आली असून लवकरच शाळांना सुट्टी सुरू होणार असून प्रवाशांची गैरसोय होऊ नये म्हणून यातून काही मार्ग तत्काळ निघणे गरजेचे आहे. त्यामुळे सोमवारी दुपारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या उपस्थितीत एक बैठक होणार आहे. त्यामध्ये थकीत देणी रक्कम हप्ता सुरू करण्यात आला नाही तर धरणे व ठिय्या आंदोलन बेमुदत सुरू राहील असेही कृती समितीच्या बैठकीत ठरले आहे.

**या आहेत मागण्या**

२०१८ पासून महागाई भत्ता फरक देण्यात आला नसून सन २०२० ते २०२४ या कालावधीतील वेतनवाढ फरकाची रक्कम थकीत आहे. याशिवाय इतर अनेक रक्कमा थकीत असून एकूण ४००० कोटी रुपयांपेक्षा जास्त थकीत रक्कम कर्मचाऱ्यांना मिळालेली नाहीत. थकीत रक्कम कर्मचाऱ्यांना मिळण्यासाठी एक वेळचा पर्याय म्हणून सरकारने ही रक्कम एसटीला दिली पाहिजे अशी मागणीही कृती समितीच्या वतीने करण्यात आली आहे.

----------

### राज ठाकरे स्नेहभोजनासाठी

ठाकरे गटामध्ये युतीवर अंतिम चर्चा झाल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. गेल्या काही दिवसांपासून मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेनेचे उद्धव ठाकरे यांच्यामध्ये सातत्याने भेटीगाठी होत आहेत. मराठीच्या मुद्द्यावरून हे दोन बंधू एकत्र आले. त्यानंतर रविवारची ही त्यांची सहावी भेट आहे. राज ठाकरे हे सहकुटुंब उद्धव ठाकरेंचे निवासस्थान मातोश्रीवर पोहोचले. यावेळी त्यांची आणि उद्धव ठाकरे यांच्या मध्ये पावणे तीन तास चर्चा झाल्याची माहिती आहे. आता ही चर्चा नेमक्या कोणत्या मुद्द्यावर झाली, मुंबई महापालिकेच्या निवडणुकीवर या भेटीमध्ये काही चर्चा झाली का याची मात्र स्पष्टता नाही. राज ठाकरेंच्या मनसेकडून दिवाळीत शिवाजी पार्कमध्ये दीपोस्तवाचे आयोजन करण्यात येते. त्या कार्यक्रमाला राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरेंना निमंत्रण दिले का, उद्धव ठाकरे हे मनसेच्या दीपोस्तवाला हजर राहणार का हे पाहावे लागेल. तब्बल दोन तास ४० मिनिटांनी राज ठाकरे मातोश्रीवरुन बाहेर पडले. त्यांच्या मागे मित ठाकरे, मिताली ठाकरे आणि उर्वशी ठाकरे यांची गाडी बाहेर पडली.

---------------

### एका झटक्यात २० हजार

देशातील २८० अब्ज डॉलरच्या तंत्रज्ञान उद्योगात मोठी खळबळ उडाली आहे. गेल्या दोन वर्षांत प्रथमच टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसची कर्मचारी संख्या ६,००,००० च्या खाली आली आहे. हा आकडा भारतातील या आउटसोर्सिंग पॉवरहाऊससाठी एक मोठा टर्निंग पॉईंट आहे. ३० सप्टेंबर रोजी संपलेल्या तिमाहीत, टीसीएसने केवळ तीन महिन्यांच्या कालावधीत १९,७५५ कर्मचाऱ्यांची कपात केली आहे. कंपनीच्या ताज्या तिमाही अहवालानुसार, ही कपात मागील तिमाहीच्या तुलनेत ३.२ टक्के घट दर्शवते, ज्यात स्वेच्छानिवृत्ती आणि नोकरकपात दोन्हीचा समावेश आहे. कंपनीने नोकरीतून काढून टाकण्याशी संबंधित खर्च भागवण्यासाठी १,१३५ कोटी बाजूला ठेवले आहेत. टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसचे मुख्य एचआर सुदीप कुन्नुमल यांनी सांगितले की, सध्याची पुनर्रचना प्रामुख्याने मध्यम आणि वरिष्ठ स्तरावरील भूमिकांवर केंद्रित आहे. ब्लूमबर्गच्या वृत्तानुसार, कौशल्ये आणि क्षमतेतील तफावत हे यामागचे मुख्य कारण आहे. टीसीएसने मार्च २०२६ पर्यंत जागतिक कर्मचाऱ्यांपैकी २ टक्के कपात करण्याची योजना आखली आहे आणि कंपनी त्या दिशेने निम्मा टप्पा पूर्ण करत आहे. आणि ऑटोमेशन-आधारित सेवांकडे कंपनीचे लक्ष वळवण्यासाठी उचललेले हे पाऊल आहे.

-----------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
सोमवार दि. १३ ऑक्टोबर २०२५



## थोडक्यात...

### पाटोद्यात आंतरमहाविद्यालयीन विभागीय काव्यवाचन स्पर्धा

पाटोदा । प्रतिनिधी

बीड जिल्ह्याच्या राजकारणातील भीष्म पितामह, सहकार व शिक्षणमहर्षी श्री. शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या ८८ व्या वाढदिवसानिमित्त सोमवारी दि. १३ ऑक्टोबर रोजी पाटोदा येथे आंतरमहाविद्यालयीन विभागीय काव्यवाचन स्पर्धा आयोजित करण्यात आली असल्याची माहिती प्राचार्य डॉ. विश्वास कदम आणि प्र. प्राचार्य प्रा. सोमनाथ घाडगे यांनी दिली आहे. जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाच्या पाटोदा येथील कला व विज्ञान महाविद्यालयाच्या मराठी विभाग, सांस्कृतिक विभाग आणि विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने या काव्यवाचन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेतील विजेत्यांना रोख रक्कम अनुक्रमे पाच हजार रुपये, तीन हजार रुपये व दोन हजार रुपये अशी पारितोषिके प्रदान करण्यात येणार आहेत. त्याचसोबत स्मृतिचिन्ह आणि सन्मानपत्रही देण्यात येणार आहे. सदरील स्पर्धेसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठास संलग्न असलेल्या सर्व महाविद्यालयांच्या स्पर्धकांना निमंत्रीत करण्यात आले असून स्पर्धेची जय्यत तयारी सुरू आहे. या स्पर्धेचे समन्वयक प्रा. बापू घोक्षे (९४२०८१६६६६), डॉ. रामकृष्ण प्रधान (९५२७३८८१५६), डॉ. कल्पना घारगे (९४२३७१६१७१), डॉ. अशोक देवगुडे (८६६८२७१५१९) यांच्यासह महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक आणि कर्मचारी परिश्रम घेत आहेत.

### सर्व पदवीधारकांनी मतदार नाव नोंदणी करुन घ्यावी – गणेश बजगुडे

बीड । प्रतिनिधी


पदवीधर मतदार संघ निवडणुकीच्या अनुषंगाने मराठवाडा पदवीधर विभागाची मतदार नोंदणी सुरु झालेली असुन दिनांक ०१/ ११/ २०२२ पुर्वी पदवीधर (डिग्री) असलेले किंवा ३ वर्षाची पदविका (डिप्लोमा) असलेल्या मराठवाडा विभागातील छत्रपती संभाजी नगर, जालना, बीड, धाराशिव, लातूर, परभणी, नांदेड, हिंगोली या सर्व जिल्ह्यातील पदवीधर मतदार बंधु भगिनींनी मतदार नाव नोंदणी करुन घ्यावी. मागील निवडणुकीत नोंदणी केलेली असेल किंवा मतदान देखील केलेले असेल तरी देखील नव्याने नोंदणी करावी लागते यासाठी आपली डिग्री, किंवा डिग्रीचा शेवटच्या वर्षाचा मार्कमेमो, आधारकार्ड, मतदान कार्ड, फोटो आदी कागदपत्रासह पदवीधर मतदार संघासाठी असलेला नाव नोंदणी अर्ज भरुन संबंधित तहसील कार्यालयात जमा करावेत किंवा बीड तालुका काँग्रेस कमिटी व शिवक्रांती युवा परिषदेच्या वतीने सुरु केलेल्या मराठवाडा पदवीधर मतदार नोंदणी मदत केंद्र, बजगुडे निवास, खडकपुरा बीड. संपर्क – ९४२१२८१०१२ याठिकाणी जमा करुन तत्काळ नावनोंदणी करावी असे आवाहन शिवक्रांती युवा परिषदचे अध्यक्ष तथा काँग्रेसचे तालुकाध्यक्ष गणेश दादा बजगुडे पाटील यांनी केले आहे.



### प्रा.डा.राम बोडखे यांना पितृशोक

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील आदर्श गांव सराटेवडगाव,आनंदवाडी येथील माजी सरपंच तथा कडा येथील आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी धोंडे महाविद्यालयातील इतिहास विभाग प्रमुख प्रा.डा.राम बोडखे आणि आष्टी येथील पंडीत जवाहरलाल नेहरु विद्यालयाचे प्राचार्य सुरेश बोडखे यांचे वडील सराटेवडगाव सेवा सहकारी सोसायटीचे माजी चेअरमन गहिनीनाथ भाऊ बोडखे (नाना) (वय ९०) यांचे शुक्रवार १० आक्टोबर २०२५ रोजी रात्री ८.३० वाजता वृद्धापकाळाने निधन झाले अंत्यविधी शनिवार दि.११ आक्टोबर २०२५ रोजी सकाळी ९ वाजता आनंदवाडी येथील अमरधामात झाला आहे.शेतकरी शिक्षण संस्थेचे प्रशासन अधिकारी माऊली बोडखे यांचे ते चुलते आहेत. त्यांच्यापठीमागे पत्नी,दोन मुले , सौ.रतन तुकाराम नन्नवरे ही मुलगी,सुना,नातवंडे असा मोठा परिवार आहे.अंत्यविधीस माजी आ.भीमराव धोंडे,ह.भ.प. निवृत्तीदादा बोडखे महाराज, ह.भ.प.आप्पासाहेब सुंबरे महाराज,प्राचार्य डा.हरिदास विधाते,प्राचार्य डा.दत्तात्रय वाघ,प्राचार्य डा.माळी,डा.डी. बी.राऊत,प्रा.शिवदास विधाते, विठ्ठलराव बन्सोडे,जिजाराम डोके,डा.सचिन टेकाडे,डा.संदीप टेकाडे, राजाराम नन्नवरे, चेअरमन बबन नन्नवरे,संदीप सुंबरे पाटील,शेख अन्सारभाई, कोंडीभाऊ झांबरे,रमेश मुळे,चेअरमन अरुण सायकड, चेअरमन बाळासाहेब शिंदे, उपसभापती नामदेव धोंडे, पांडुरंग धोंडे,प्रा.डा.बाळासाहेब धोंडे,उपप्राचार्य डा.भास्कर चव्हाण,उपप्राचार्य संजय धोंडे, राजेंद्र धोंडे,अशोक तरटे,शाम सांगळे,मुस्ताक पानसरे,निवृत्ती बन्सोडे,दत्तात्रय गिलचे, उपप्राचार्य सुनिल भवर, सोपानकाका मुळे,विठ्ठल लांडगे,शिवाजी थोरवे आदि सामाजिक,राजकीय,धार्मिक, शिक्षण क्षेत्रातील मान्यवर, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# ज्या शेतकऱ्यांनी पिकवलेले अन्न एवढे वर्षे खाल्ले त्यांच्या उध्दारासाठी यापुढे काम करणार –गांधी

## ग्लोबल विकास ट्रस्टच्या वतीने बोरखेड व तेलसमुख येथे पुरग्रस्त शेतकऱ्यांना किराणा किटचे वाटप

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

शेतकरी राबराब राबतात, शेतात घाम गाळतात आणि त्यानंतर त्यांनी पिकवलेले अन्नधान्य जगाला जगवते, म्हणूनच त्याला जगाचा पोशिंदा म्हटले जाते. मीही आयुष्याची एवढी वर्षे शेतकऱ्यांनी पिकवलेले अन्नधान्य खाल्ले आहे. या ऋणातून उतराई होण्यासाठी मी उरलेले आयुष्य खर्च करणार असून, शेतकऱ्यांच्या उत्पन्न वाढीसाठी काम करणार असल्याचे प्रतिपादन ग्लोबल विकास ट्रस्टचे अध्यक्ष मयंक गांधी यांनी केले. परळी वैजनाथ तालुक्यातील मौजे बोरखेड तसेच तेलसमुख येथे पुरपरिस्थितीमुळे नुकसान झालेल्या शेतकरी कुटूंबांना किराणा किटचे वाटप करण्यात आले, याप्रसंगी ते बोलत होते.



परळी वैजनाथ तालुक्यातील मौजे बोरखेड तसेच तेलसमुख येथे पुरग्रस्त शेतकरी कुटूंबांना ग्लोबल विकास ट्रस्टकडून किराण किटचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी दोन्हीही गावातील शेकडो नागरीकांची मोठ्या संख्येने उपस्थितीती होती. परंपारीक शेतीत बदल करून कुठेतरी आता शाश्वत शेतीकडे वळण्याची गरज निर्माण झालेली आहे. सोयाबीन, कापूस, ऊस आदी पिके ही घ्यायची म्हणून शेतकरी घेतात, मात्र हिशोब केला तर त्यातून कवडीचेही उत्पन्न मिळत नाही. वर्षानुवर्षे तोट्यातील शेतकरी कर्जाच्या अगदी खाईत जात आहेत. त्यावर उपाय म्हणून केळी, अंबा, सिताफळ, तुती अशा पिकांकडे शेतकऱ्यांनी वळले पाहीजे. ग्लोबल विकास ट्रस्टकडून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना फळबाग लागवडीबाबत मोफत प्रशिक्षण देण्यात येते. आजघडीला जवळपास ३० हजार पेक्षा जास्त शेतकरी ग्लोबल विकास ट्रस्टसोबत जोडल्या गेलेले आहेत. त्या सर्व शेतकऱ्यांच्या कुटूंबाची अर्थव्यवस्था पूर्वीपेक्षा जास्त सुधारली असून, आज ते समाधानी जीवन जगत आहेत. येणाऱ्या काळात फळपिक लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांना आवश्यक असलेली सर्वतोपरी मदत करण्याचा आमचा संकल्प असून, शेतकऱ्यांनी सिरसाळा येथील कृषीकूलमध्ये यावे. तेथील उपलब्ध सर्व बाबींचा अभ्यास करावा आणि येणाऱ्या काळात फायदा करून घ्यावा असे आवाहन ग्लोबल विकास ट्रस्टचे अध्यक्ष मयंक गांधी यांनी शेतकऱ्यांना केले आहे.

३ हजारपेक्षा जास्त शेतकरी कुटूंबांना किराणा किटचा मिळतोय लाभ!

ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले. शेतातील पिके वाहून गेली, पिकांसोबत शेतातील मातीही वाहून गेल्याने पुढील किमान तीन वर्षे त्या शेतीतून उत्पन्न मिळू शकणार नाही. अशा अवस्थेत शेतकऱ्यांनी जगायचे कसे? असाच मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. खूप काही नाही, परंतू दसरा आणि दिवाळी सण तरी त्यांना आनंदात साजरे करता यावेत या हेतूने ग्लोबल विकास ट्रस्टकडून मदतीचा हात पुढे करण्यात आलेला आहे. २२ प्रकारच्या जीवनावश्यक वस्तू असलेल्या तीन हजारपेक्षा जास्त किराणा किटचे १६ गावांमध्ये वाटप करण्यात येत आहे.

# शिक्षणाधिकाऱ्यांची भागूजीराव ढेकळे विद्यालयास सदिच्छा भेट

**गेवराई । प्रतिनिधी**

**निपुण महाराष्ट्र पुनर्मूल्यमापन तपासणी करण्यासाठी बीडच्या शिक्षणाधिकारी श्रीमती प्रियाराणी पाटील यांनी केपी.बी.डी.विद्यालय,पाडळसिंगी येथे भेट दिली.**



दि. १० ऑक्टोबर २०२५ रोजी निपुण महाराष्ट्र पुनरमूल्यमापन तपासणी अंतर्गत बीड जिल्ह्याच्या शिक्षणाधिकारी तथा विभागीय सहसचिव(म.रा.माध्य.व उच्च माध्य.शिक्षणमंडळ,संभाजीनगर) यांनी कृषी पंडित भागुजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पाडळसिंगी येथे भेट दिली असता विद्यालयातील विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करून विद्यालयाच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले. याप्रसंगी तुरुकमारे साहेब(ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी जि.प.बीड.) पाडळसिंगी केंद्राचे केंद्रप्रमुख नारायण मराठे, मकरध्वज जगताप ,गणेश दहिवाळ उपस्थित होते. सर्वांचे विद्यालयाच्या वतीने मुख्याध्यापक थिटे ए.एस.यांनी स्वागत केले.याप्रसंगी विद्यालयाचे पर्यवेक्षक राजेंद्र रांजवण, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# गुन्हेगाराच्या टोळीवर मोक्का कायद्याअंतर्गत कारवाई होणार

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हयातील कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी शर्थीचे प्रयत्न चालवले आहेत. बीड जिल्हयातील गुन्हेगारीचे व गुंडगिरीचे समुळ उच्चाटन करण्याचा उदात्त दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवुन चउजउ- व चझऊ- अन्वये बऱ्याच गुन्हेगारांवर व गुंडावर कार्यवाही करण्याचा धडाका सुरु ठेवला आहे. जिल्हयात चोऱ्या, दरोडे, घरफोड्या, खुन, खुनाचा प्रयत्न, दरोडयाची तयारी, बलात्कार, पळवुन नेणे, खंडणी मागणे अशा गंभीर स्वरुपाचे गुन्हे करणाऱ्या गुन्हेगारांविरुध्द ठोस कारवाई करण्यासाठी बीड जिल्हयातील पोलीस जिल्हयातील व जिल्हाचे बाहेरील गुन्हेगारावर करडी नजर ठेऊन आहेत. नेकनूर प्रकरणातील आणखी सहा गुन्हेगारावर ही कारवाई होणार आहे.

पो.स्टे. नेकनुर पोलीस ठाणे हद्दीत लिंबागणेश गावचे शिवारातील ओटू पावर कंपणीची पवनचक्की क्र. ३९ वर १२ ते १४ चोरट्यांनी कुलुप तोडून पवनचक्कीला जोडलेले कॉपर वायरचे एकुण २३ वायर चोरी करण्याच्या उद्देशाने तोडून १७,७५,७२३/- रु चे नुकसान केले. आरोपीतांनी फिर्यादी व साक्षीदार यांचेवर कोयता व लोंखडी रॉड हातात घेऊन हवेत फिरवुन चाल केली असता यातील साक्षीदार वॉचमन यांनी परवाना धारक पिस्टल मधुन दोन राऊंड फायर केले असता त्यात एक आरोपी नामे राजु विष्णु काळे रा. तुळजापुर जि. धाराशिव हा मरण पावला. फिर्यादीवरुन व पुरवणी जवाबा वरुन सदरचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयांचा प्रथम तपास पोउपनि रोकडे व त्यांनतर सपोनि चंद्रकांत गोसावी यांनी केला आहे.

सदर गुन्ह्याचे तपासात नेकनुर/ स्थागुशा पोलीसांनी आरोपींचा बारकाईने शोध घेवुन सदर गुन्ह्यातील आरोपी सुभाष भास्कर काळे वय ४४ वर्षे रा. अंधोरा ता. कळंब जि. धाराशिव (टोळी प्रमुख), बाबुशा भिमराव काळे वय २५ वर्षे रा. अंधोरा ता. कळंब जि. धाराशिव,रामा ऊर्फ बिल्या शंकर काळे वय २२ वर्षे रा. कन्हेरवाडी ता. कळंब जि. धाराशिव, आरोपी क्र.१ व २ यांना दिनांक ०७.०७.२०२५ रोजी व आरोपी क्र.३ यास १८.०७.२०२५ रोजी अटक केली व त्यांची झउठ घेऊन तपास केला आहे. तसेच गुन्हयांत इतर ०४ आरोपी निष्पन्न झाले असुन त्यापैकी ०१ मयत व ३ फरार आहेत पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. या प्रकरणातील सहा आरोपीवर मकोका अंतर्गत कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे .

# राज्यस्तरीय शालेय स्पर्धेसाठी बीडच्या चॅम्पियन्स क्लबच्या २२ खेळाडूंची निवड

**बीड । प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी होणाऱ्या महाराष्ट्र शासनाच्या राज्यस्तरीय शालेय तायक्वांदो स्पर्धेसाठी चॅम्पियन्स अकॅडमी बीड व बीड जिल्ह्यातील २२ खेळाडूंची विभागीय संघात निवड झाली आहे अशी माहिती तायक्वांदो असोशिएशन फ महाराष्ट्र मुंबई संघटनेचे अध्यक्ष डॉ अविनाश बारगजे यांनी दिली आहे.**



क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे व छत्रपती संभाजीनगर जिल्हा क्रीडा कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १३ ते १६ ऑक्टोबर २०२५ दरम्यान गारखेडा परिसरातील विभागीय क्रीडा संकुल येथे यावर्षीची राज्यस्तरीय शालेय तायक्वांदो स्पर्धा १४,१७ व १९ वर्षे वयोगटात पार पडणार आहे . संपूर्ण महाराष्ट्रातील ८ प्रशासकीय विभागातून निवड झालेले जवळपास ३०० खेळाडू या स्पर्धेमध्ये सहभागी होतील. बीडच्या खेळाडूंनी पुन्हा एकदा या तायक्वांदो स्पर्धेवर आपले वर्चस्व राखताना विभागीय स्पर्धेत मोठे यश मिळवले आहे . विजेत्या खेळाडूं मध्ये बहुतांश खेळाडू हे जिल्हा क्रीडा संकुलातील डॉ. अविनाश बारगजे यांच्या चॅम्पियन्स तायक्वांदो अकॅडमीचे खेळाडू आहेत. १४ वर्ष गटातील विजेते खेळाडू – सांनवी राठोड , कल्याणी घुगे, श्रेयश वाव्हळ , निखिल आंधळे व विनोद गारदी ( वडवणी)

१७ वर्ष गटातील विजेते खेळाडू – राष्ट्रीय खेळाडू यशस्वी चव्हाण, कार्तिकी मिसाळ व श्रवण तांबारे यांच्यासह दर्शनी शिंदे , समर्थ आंधळे , सार्थक ठेंगल, स्वराज घोडके व यश चव्हाण यांची निवड झाली आहे .

१९ वर्षे गटातील विजेते खेळाडू – राष्ट्रीय खेळाडू ओंकार परदेशी, अभिषेक आमटे , सुमित राऊत, धनंजय आतरकर , माऊली पवार , नेहा आंधळे व साक्षी केकाण ( अंबाजोगाई ), कृष्णा धुमाळ ( आष्टी ) यांची निवड झाली आहे . डॉ. अविनाश बारगजे व जया बारगजे यांच्या मार्गदर्शनाखाली संघ प्रशिक्षक म्हणून शेख अनिस ,देवेंद्र जोशी , ऋत्विक तांदळे, नितीन आंधळे व बाळासाहेब आंधळे , बालाजी कराड यांनी काम पाहिले. सर्व विजेते खेळाडू छत्रपती संभाजीनगर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय शालेय तायक्वांदो स्पर्धेसाठी पात्र ठरले आहेत. या सर्व खेळाडूंना जिल्हा संघटनेचे मार्गदर्शक डॉ योगेश क्षीरसागर , डॉ सारिकाताई क्षीरसागर जिल्हा क्रीडा अधिकारी श्री. अरविंद विद्याघर सर , क्रीडा अधिकारी श्री. अनिकेत काळे , जिल्हा संघटनेचे अध्यक्ष श्री. नितीनचंद्र कोटेचा , श्री.दिनकर चौरे , डॉ अविनाश बारगजे , जया बारगजे , श्री. बन्सी राऊत, श्री. भरत पांचाळ , डॉ. विनोदचंद्र पवार, श्री.मनेश बनकर, श्री.सुनिल राऊत , श्री.प्रसाद साहू , श्री.बालाजी कराड यांच्यासह जिल्हा संघटनेच्या सर्व वरिष्ठ खेळाडू अधिकारी , सर्व पदाधिकाऱ्यांनी खेळाडूंना अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

# काळी दिवाळी साजरी करण्याचा इशारा देताच टप्पा वाढ निधीसाठी हालचाली गतिमान

**बीड । प्रतिनिधी**

विनाअनुदानित शाळानां दिलेल्या वाढीव २० टक्के टप्पा अनुदानासाठी निधीची तरतूद करावी या मागणीसाठी ८ आणि ९ जुलै रोजी आझाद मैदानावर ऐतिहासिक आंदोलन झाले होते. या आंदोलनाचे फलनिष्पत्ती म्हणून २५ ऑगस्ट २०२५ रोजी शासन निर्णय झाला. परंतु अद्याप ही वाढीव टप्प्याप्रमाणे अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या खात्यावर वाढीव टप्प्याचे वेतन झाले नाही.



या वाढीव टप्प्याप्रमाणे निधीची तरतूद व्हावी यासाठी अनेक दिवसापासून आजी व माजी शिक्षक आमदार यांच्यासह शिक्षक संघटना प्रयत्न करीत आहेत. परंतु

शासनस्तरावर कोणतीच हालचाल होत नसल्याने विनाअनुदानित शाळा कृती समितीने वाढीव टप्पा नुसार निधीची तरतूद होऊन वेतन २० ऑक्टोबर २०२५ पूर्वी न झाल्यास २१ ऑक्टोबर रोजी दिवाळी दिवशीच राज्यातील सर्व शिक्षण उपसंचालक आणि सर्व जिल्ह्यातील शिक्षणाधिकारी यांच्या दारात काळी दिवाळी साजरी करण्याचा इशारा देण्यात आला होता. विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या या इशारा आंदोलनाची शासन आणि प्रशासनाने गांभीर्याने दाखल घेतली. प्रत्यक्षात टप्पा वाढ निधी वितरण हालचालीस गती आली आहे. सोमवार मंगळवार पर्यंत निधी वितरणाचे आदेश राज्यातील सर्व शिक्षणाधिकारी वेतन अधीक्षक यांना दिले जाऊन प्रत्यक्ष विनाअनुदानित शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या खात्यात वेतन जमा करण्याच्या कामाला गती मिळू शकते अशी माहिती सुत्रांनी दिली आहे.

तर आंदोलन करणार खंडेराव जगदाळे

२० ऑक्टोबर पर्यंत टप्पा वाढीचे अनुदान आदेशासह वेतन मिळाले नाही. तर २१ ऑक्टोबर २०२५ रोजी काळी दिवाळी धरणे आंदोलन सर्व राज्यात करणार असल्याचे कृती समितीचे राज्य उपाध्यक्ष खंडेराव जगदाळे यांनी सांगितले

ज्या जिल्ह्यात वाढीव टप्प्याचे आदेश मिळाले नसतील तिथे कृती समितीच्या पदाधिकारी यांना संपर्क साधून आदेश प्राप्त करून घ्यावेत.काही तक्रार किंवा अडचण असतील किंवा आदेश देण्यासाठी टाळाटाळ करीत असतील किंवा याबाबत घोडेबाजार सुरू असेल तर त्या जिल्ह्याच्या कृती समितीच्या पदाधिकारी यांना संपर्क साधावा असे आवाहन विनाअनुदानित शाळा कृती समितीचे राज्य उपाध्यक्ष खंडेराव जगदाळे यांनी केले आहे.

# आई-बाबा मला जिवदान मिळेल का, चिमुकल्या श्रेयाची आर्त किंकाळी

## चिमुकल्या श्रेयाच्या वैद्यकीय उपचारासाठी आर्थिक मदतीची गरज, समाजातील दानशूरानी मदतीसाठी पुढे येण्याचे आवाहन

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यातील कुप्पा येथील पत्रकार शंकर जाधव यांची नऊ वर्षीय मुलगी श्रेया हिला जन्माच्या तीन महिन्यापासून थॅलेसिमिया आजार असुन तिच्या बेंगलोर येथील हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी डॉक्टरांनी तब्बल १५ लाख रुपये खर्च येणार असल्याचे सांगितले आहे तरी चिमुकल्या श्रेयाला जीवदान देण्यासाठी समाजातील दानशूर व्यक्ती संस्था लोकप्रतिनिधी यांनी पुढे येऊन आर्थिक मदतीचा हात देण्याची आवश्यकता आहे.

सविस्तर वृत्त असे की, वडवणी तालुक्यातील कुप्पा येथील रहिवासी असलेले पत्रकार शंकर जाधव ते पत्नी, मुलगा, मुलगी आई-वडिलांसह राहतात त्यांना एकच मुलगी कु श्रेया आहे.अत्यंत गरीब परिस्थितीमध्ये मोलमजुरी करून आपला कुटुंब उदरनिर्वाह भागवतात. त्यांची आर्थिक परिस्थिती ही हालाकीची असून त्यांना शेती किंवा इतर काही व्यवसाय नाही पत्रकार शंकर जाधव यांची मुलगी कु.श्रेया हिला थॅलेसिमिया हा दुर्धर आजार जडला आहे. तिच्या शरीरात नैसर्गिक रक्त तयार होत नसल्यामुळे वय वर्ष ०३ महिन्याची असल्यापासून आज ९ वर्षाची असून तिला पंधरा दिवसाला रक्त द्यावे लागत आहे. तिच्या कुटुंबीयांनी आजपर्यंत तिला परिस्थिती नसताना मजुरी व काबाडकष्ट करून दहा ते बारा लाख रुपये खर्च केलेला आहे. तिला सध्या बेंगलोर येथे उपचार सुरू आहेत. यासाठी हॉस्पिटल साठी १५ लाख व इतर दहा लाख असा एकूण २५ लाख लाख रुपये खर्च येणार असून तिच्या उपचारासाठी कुटुंबीयांना एक वर्ष बेंगलोर येथे राहावे लागणार आहे तसेच तिचा वैद्यकीय उपचार हा अत्यंत कठीण असून यामध्ये तिच्या जिवीताला देखील धोका डॉक्टरांनी सांगितलेला आहे. तरी श्रेया हिला जीवदान मिळावे यासाठी वैद्यकीय उपचारासाठी मोठा खर्च येणार आहे तरी त्यासाठी समाजातील दानशूर व्यक्ती, सामाजिक संस्था लोकप्रतिनिधी यांनी पुढे येऊन फुल नाही फुलाची पाकळी पत्रकारांच्या मुलीचा जीव वाचवण्यासाठी आर्थिक मदत करावी असे आवाहन पत्रकार शंकर जाधव यांनी केले आहे. तरी रामेश्वरी शंकर जाधव यांचा भारतीय स्टेट बँक खाते नंबर ४२६६४७२७९४८,आय एफ सी कोड नं.एस बी आय एन ०००४७५६ यावर किंवा फोन पे नंबर ९९७५६११७७५ यावर आर्थिक मदत करण्याचे आवाहन केले आहे.



श्रेया शंकर जाधव थॅलेसेमिया मेजरने ग्रस्त आहे आणि ६ महिन्यांपासून नियमित बायोड ट्रान्सफ्युजन घेत आहे. या स्थितीसाठी एकमेव उपचारात्मक पर्याय म्हणजे बोन मॅरो ट्रान्सप्लांटेशन (बी एम टि). आम्ही कुटुंबाला एच एल ए टायपिंग ऑफर केले आणि ते हॅप्लोइडेंटिकल वडिलांशी मॅच असल्याचे आढळले. प्रत्यारोपणासाठी निवडलेल्या वडिल शंकर जाधव दात्याने दान केलेल्या बोन मॅरोचा वापर करण्याची आमची योजना आहे. प्रत्यारोपण केले जात आहे. सहाय्यक संकल्प इंडिया फाउंडेशन कडून ना-नफा तत्वावर पॅलेंटला ही सेवा देण्यात आली आहे. प्रत्यारोपणाचा एकूण खर्च सुमारे १५,००,००० रुपये असेल (फक्त पंधरा लाख रुपये). खर्चात हे समाविष्ट आहे: प्रत्यारोपणापूर्वीचे काम औषधे आणि डिस्पोजेबल,निदान,खोलीचे शुल्क ज्यामध्ये डॉक्टरांचे शुल्क, नर्सिंग शुल्क, बॉडी शुल्क, जेवणाचे शुल्क आणि इतर विविध हॉस्पिटलायझेशन शुल्क समाविष्ट आहे.प्रक्रिया शुल्क प्रत्यारोपणानंतरचा पाठपुरावा प्रत्यारोपणासाठी हा एक पॅकेज खर्च आहे आणि जीवघेणा संसर्ग झाल्यास वाढू शकतो कारण प्रत्यारोपणादरम्यान संसर्गावर उपचार करण्यासाठी वापरले जाणारे एजंट महाग असतात. प्रक्रियेसाठी आवश्यक असलेले पैसे तयार होताच आम्ही मुलाला प्रत्यारोपण करण्याची योजना आखत आहोत. कोणत्याही प्रश्नाच्या बाबतीत कृपया माझ्याशी संपर्क साधावा

डॉ. डि. एम.मोहना रेड्डी ( बेंगलोर)

# लऊळ येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिर

## सद्गुरू प.पू. मोरेदादा चॅरिटेबल ट्रस्ट हॉस्पिटलचा उपक्रम

माजलगाव । प्रतिनिधी

अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ त्र्यंबकेश्वर चे पिठाधीश परमपूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या आशीर्वादाने सद्गुरू प पू मोरेदादा चॅरिटेबल ट्रस्ट हॉस्पिटल त्र्यंबकेश्वर आयोजित माजलगाव तालुक्यातील लऊळ येथे मोफत आरोग्य तपासणी नाडी परीक्षण व सर्व रोग निदान शिबिर मोठ्या प्रतिसादात संपन्न झाले.



या आरोग्य तपासणी शिबीराची सुरुवात दिपप्रज्वलन व धन्वंतरी पूजन करुन झाले यावेळी सद्गुरू प पू मोरेदादा चॅरिटेबल ट्रस्ट हॉस्पिटल चे डॉ मोहन गौरकर, डॉ कृष्णा खैरनार तसेच डॉ यशवंत राजेभोसले, डॉ अशोक घुबडे, सरपंच लक्ष्मण सरवदे, द्वारकादास शिंदे (चेअरमन- सेवा सहकारी सोसायटी ), बारिकराव शिंदे (संचालक- सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखाना) , अण्णासाहेब शिंदे (व्हाइस चेअरमन- सेवा सहकारी सोसायटी), काशिनाथ सरवदे (सेवानिवृत्त पोलिस उपनिरीक्षक), रामभाऊ शिंदे (ग्रामसेवक), राजेंद्र भंडारी (संचालक- सेवा सहकारी सोसायटी), डॉ सीमा बाहेती, डॉ शिल्पा हुमारी तसेच परमपूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज कॅन्सर रिसर्च सेंटरची टीम उपस्थित होते. यावेळी डॉ मोहन गौरकर यांनी श्री स्वामी समर्थ सेवा मार्गाचे उपक्रम व आरोग्य विषयक मार्गदर्शन केले. या शिबीराचे प्रास्ताविक डॉ यशवंत राजेभोसले यांनी केले. या शिबिरात बीपी, शुगर, नाडी परीक्षण, इसीजी, फेजिओथेरेपी इत्यादी सुविधा मोफत देण्यात आल्या या शिबीराचा शहरातील शेकडो रुग्णांनी लाभ घेतला.

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
सोमवार दि.१३ ऑक्टोबर २०२५
४

# जमीन मोजणीचा निपटारा आता केवळ ३० दिवसांत

## महसूल विभाग घेणार खासगी भूमापकांची मदत

पुणे : जमीन मोजणीचा निपटारा करण्यासाठी ९० ते १२० दिवसांचा कालावधी लागतो. आता ही प्रक्रिया ३० दिवसांत होणार आहे. महसूल विभागाने परवानाधारक खासगी भूमापकांची नियुक्ती करण्याचा निर्णय घेतला असून, त्या बाबतची अधिसूचना जारी केली आहे.

यामुळे राज्यातील प्रलंबित सुमारे तीन कोटी १२ लाख प्रकरणे मार्गी लागतील, असा विश्वास महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला. या नवीन निर्णयामुळे जमीन मोजणीच्या निपटाऱ्यासाठी साधारणतः ९० ते १२० दिवस लागायचे. मात्र आता ही प्रक्रिया केवळ ३० दिवसांत पूर्ण होणार आहे. राज्यात सध्या सुमारे तीन कोटी प्रलंबित जमीन मोजणीची प्रकरणे आहेत. ही प्रकरणे वेळेत निकाली काढण्यासाठी सरकारने खासगी क्षेत्राची मदत घेण्याचा मार्ग स्वीकारला आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विश्वास



व्यक्त केला आहे की, या नव्या पद्धतीमुळे नागरिकांना वेळेवर सेवा मिळेल, प्रकरणांचा निपटारा अधिक कार्यक्षमतेने होईल आणि महसूल विभागावरचा ताणही कमी होईल. या नव्या प्रणालीनुसार, सरकारकडून उच्च तांत्रिक पात्रता असलेल्या व्यक्तींना खासगी भूमापक म्हणून काम करण्याचा परवाना दिला जाईल. त्यानंतर तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, उपअधीक्षक भूमी अभिलेख किंवा नगर भूमापन अधिकारी त्या मोजणीच्या कागदपत्रांची तपासणी करून त्यांना प्रमाणित करतील.

आधी मोजणी, मग खरेदीखत :

यापुढे राज्यात आधी मोजणी, मग खरेदीखत आणि त्यानंतर फेरफार अशा पद्धतीने जमिनीचे व्यवहार व्हावेत, यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. जमीन मोजणीचा निपटारा करण्यासाठी ९० ते १२० दिवसांचा कालावधी लागतो. आता ही प्रक्रिया ३० दिवसांत होणार आहे. महसूल विभागाने परवानाधारक खासगी भूमापकांची नियुक्ती करण्याचा निर्णय घेतला असून, त्या बाबतची अधिसूचना जारी केली आहे.

# मोगरा फुलशेती तंत्रज्ञान

गेल्या काही दिवसांपासून राज्यात फुल शेतीला विशेष महत्व प्राप्त झाले आहे. यातही शेतकरी शेवंती, गुलाब, झेंडू या फुलांकडे अधिक प्रमाणात वळत आहे. काही प्रमाणात मोगऱ्याच्या फुलांची देखील शेतकरी लागवड करत आहे. मात्र, इतर फुलांपेक्षा मोगरा लागवडीचे प्रमाण कमी आहे. मोगऱ्याचे फुल हे दररोज देव पूजेसाठी, सणसमारंभांसाठी तसेच सौंदर्य प्रसाधने उद्योग, केसांचे तेल यामध्ये वापरले जाते. ज्यामुळे मोगऱ्याच्या फुलांना मोठी मागणी असते.

कधी होते लागवड?

शेती तज्ज्ञांनी मोगऱ्याच्या शेतीला व्यावसायिक शेती पीक मानले आहे. मोगऱ्याचे झाड १० ते १५ फूट उंचीपर्यंत वाढते. त्याची सदाहरित पाने दोन ते तीन इंच लांब आणि देठ पातळ असते. मोगऱ्याची फुले पांढरी असून, ती अतिशय सुंदर आणि सुवासिक असते. मोगऱ्याच्या झाडाला मार्च ते जून महिन्यात फुले येतात. मोगऱ्याचा फुलाचा वापर विशेषत: हार, सजावट आणि देवाच्या पूजेमध्ये केला जातो. मोगऱ्याची लागवड जून ते नोव्हेंबर या कालावधीदरम्यान केव्हाही केली जाऊ शकते.

किती मिळतो दर?

मोगऱ्याच्या फुलांना २५० रुपये प्रति किलोचा भाव सहज मिळतो. तर लग्न किंवा सण-समारंभाच्या काळात ही ४०० रुपये प्रति किलोपर्यंत विकली जातात. मोगऱ्याच्या फुलांचा उपयोग परफ्यूम, साबण, क्रीम, तेल, शॅम्पू आणि डिटर्जंट पावडरमध्ये सुगंधासाठी केला जातो. भारतात याची लागवड प्रामुख्याने पंजाब, आंध्र प्रदेश, तामिळनाडू आणि हरियाणामध्ये केली जाते.



कसे लागते हवामान?

मोगऱ्याच्या लागवडीसाठी उष्ण व दमट हवामान उत्तम मानले जाते. त्याचवेळी, त्याच्या काही जाती अगदी थंड हवामानात देखील सहजपणे वाढू शकतात. रोपाच्या वाढीसाठी सर्वात योग्य तापमान २४ अंश सेल्सिअस ते ३२ अंश सेल्सिअस तापमान आवश्यक असते. हिमाचल प्रदेश, हरियाणा, बिहार, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, गुजरात या राज्यांमध्ये नवीन वाणांपासून चांगली कमाई करता येते.

नियमित पाणी देणे आवश्यक :

मोगऱ्याच्या झाडांना नियमित पाणी द्यावे लागते. उन्हाळी हंगामात आठवड्यातून किमान दोनदा पाणी द्यावे. मध्यम हवामानात आठवड्यातून एकदाच पाणी देणे पुरेसे असते. मोगऱ्याला हंगाम आणि जमिनीनुसार सिंचन आवश्यक असते. मोगऱ्याचे रोप लावल्यानंतर नऊ ते दहा महिन्यांनी फुले येण्यास सुरुवात होते. तर काही जातींमध्ये वर्षभर झाडांना फुले येतात. बहुतेक प्रजातींमध्ये फुलांचा काळ हा मार्च ते ऑक्टोबर महिन्यापर्यंत असतो. सकाळी सूर्याची किरणे फुलांवर पडण्याआधी फुले तोडली तर उत्तम असते. त्यामुळे त्यांचा सुगंध टिकून राहण्यास मदत होते.

# 'सूर्याचे अंडे' म्हणून ओळखले जाणारे मियाझाकी आंबे

"फळांचा राजा" म्हणून ओळखला जाणारा आंबा त्याच्या स्वादिष्ट चवीसाठी मोठ्या प्रमाणात प्रसिद्ध आहे. आपल्या देशात हापूस आंब्याला त्याची चव आणि सुगंध यामुळे विशेष महत्व आहे. पण तुम्हाला माहित आहे का की जपानमधील मियाझाकी आंबा त्याची विशिष्ट गुणवत्ता आणि सर्वात जास्त किंमत यासाठी प्रसिद्ध आहे. जपानच्या क्युशू प्रांतातील मियाझाकी शहरातून उगम पावलेल्या मियाझाकी आंब्याचा १९८० च्या दशकापासूनचा समृद्ध इतिहास आहे. मियाझाकी विद्यापीठातील संशोधक आणि स्थानिक शेतकरी यांच्यातील सहकार्यामुळे या विलक्षण फळाचा विकास झाला. पारंपारिक प्रजनन तंत्र आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या संयोगाने, त्यांनी प्रदेशातील हवामान आणि मातीच्या परिस्थितीला पूर्णपणे अनुकूल अशा विविधता असणार्या आंब्याच्या जाती निर्माण केल्या. याचा परिणाम म्हणजे 'मियाझाकी आंबा' हे फळ त्याची असाधारण चव, जास्त दिवस टिकवण क्षमता आणि किडींना प्रतिकारक या गुणधर्मामुळे प्रसिद्ध आहे. मियाझाकी आंब्याचे एक वेगळे वैशिष्ट्य म्हणजे त्यांचे स्वरूप. या आंब्याच्या चमकदार रंगामुळे आणि अंड्यासारख्या आकारामुळे याला "सूर्याचे अंडे" म्हणून ओळखले जाते. या आंब्याची त्वचा जांभळ्या रंगाची असते, पिकल्यावर ती आगीसारख्या लाल रंगाची होते. आंब्याच्या हे स्वरूप त्याला आकर्षक आणि इतरांपासून वेगळे सिद्ध करते.

मियाझाकी आंबे इतके महाग का आहे? : आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मियाझाकी आंब्याला २.७५ लाख रुपये



प्रति किलोग्रॅम इतका उच्चांकी दर मिळतो. त्यामुळे हा आंबा लक्झरी म्हणजे चैनीचे फळ आहे असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. हे आंबे इतके महाग असण्याचे कारण म्हणजे मियाझाकी प्रांत, जेथे या आंब्यांची लागवड केली जाते. तेथे या आंब्याच्या वाढीसाठी एक आदर्श वातावरण आहे. उबदार हवामान, सुपीक माती आणि स्वच्छ पाण्याची उपलब्धता यामुळे या प्रदेशात इतर ठिकाणपेक्षा आकाराने मोठा, गोड आणि रसाळ आंबा तयार होतो. स्थानिक शेतकऱ्यांतर्फे काळजीपूर्वक लागवड आणि कापणीच्या पद्धती फळांच्या उत्कृष्ट गुणवत्तेत भर घालतात. प्रत्येक आंबा योग्य प्रकारे पिकल्यावर हाताने काढला जातो, परिणामी त्याची चव आणि रचना अतुलनीय असते. शिवाय, मियाझाकी आंबे जपानी सरकारने लादलेल्या कठोर गुणवत्ता मानकांच्या अधीन आहेत. वजन, आकार, साखरेचे प्रमाण आणि देखावा यांसारख्या घटकांचे बारकाईने निरीक्षण केले जाते.

लागवड पद्धत आणि मार्केट : हा आंबा लागवड करताना उच्च स्तरावरील नियमन करावे लागत असल्यामुळे गुणवत्तापूर्ण आंबे तयार तर होतात परंतु यामुळे उत्पादन खर्चातही मोठ्या प्रमाणात वाढ होते, ज्यामुळे फळांची किंमत वाढते. प्रत्येक आंब्याचा योग्य आकार आणि चव मिळवण्यासाठी काळजीपूर्वक हाताने परागीकरण आणि छाटणी केली जाते. या पद्धतींसाठी भरपूर वेळ आणि मेहनत आवश्यक आहे, ज्यामुळे एकूण उत्पादन खर्च वाढतो. मियाझाकी आंब्याची किंमत प्रचंड असूनही, मियाझाकी आंब्याने जपानमध्ये आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर लोकप्रियता मिळवली आहे. त्यांची असाधारण चव, आकर्षक स्वरूप आणि मर्यादित पुरवठा यामुळे या आंब्याला ग्राहकांकडून खूप मागणी आहे. भारतासारख्या देशांमध्ये, जेथे आंब्याला खूप किंमत आहे. मियाझाकी आंब्याचे आकर्षण विशेषतः टिकून आहे. ही फळे लक्झरी वस्तू असली, तरी आंब्याचे शौकीन अशा फळांवर अवाजवी खर्च करण्यास तयार आहेत. अलीकडच्या वर्षांत, मियाझाकी आंबा भारतातही पोहचला आहे. उच्च किंमती असूनही, या विलासी फळांमध्ये एक मोहिनी आहे जी जगभरातील आंबा प्रेमींना आकर्षित करत आहे.

# टोमॅटोवरील नागअळी

महाराष्ट्रात टोमॅटो पीक हे वर्षभर वेगवेगळ्या हंगामात घेतले जाते. जुलैअखेर नाशिकसह अन्य भागांत लागवड झालेल्या पिकावर सुरुवातीपासूनच अनेक किडी व रोगांचा प्रादुर्भाव दिसून आला. या वर्षी विशेषतः नागअळीचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणात दिसत आहे. ही कीड रोपावस्था ते पीक काढणीपर्यंतच्या सर्व काळामध्ये नुकसान करते. अळी पानांच्या आतील थरामध्ये उतकांवर उपजीविका करते. त्यामुळे ती खात पुढे सरकत असताना पानांमध्ये नागमोडी आकाराचे सुरंग तयार होतात. त्यामुळेच तिला नागअळी या नावाने ओळखले जाते. ती पानाच्या आतमध्येच कार्यरत असल्यामुळे नियंत्रण करणे कठीण जाते. वेळेवर उपाययोजना न केल्यास उत्पादनात ७० टक्क्यांपर्यंत घट येऊ शकते. नागअळी आणि टूटा अळी (शा. नाव - टूटा ॲबस्युलिटा) या दोन्ही किडींमुळे दिसणारे नुकसानीचा प्रकार काही प्रमाणात सारखाच असल्याने शेतकऱ्यांची गफलत होऊ शकते. त्यामुळे किडीची अचूक ओळख पटवून सुरुवातीपासूनच नियंत्रणाच्या उपाययोजना राबविल्यास फायदा होऊ शकतो.

या पिकांवर होतो प्रादुर्भाव :ही बहुभक्षी कीड आहे. ती बटाटा, टोमॅटो, वांगी, बीट, गाजर, काकडी, खरबूज, मिरची, दोडका, घोसाळा, शेवंती, झेंडू, अशा अनेक पिकांवर उपजीविका करते.

अंडी : या किडीची अंडी फिकट पांढऱ्या रंगाची व किंचित पारदर्शक असतात. त्याचा आकार साधारणतः ०.२ ते ०.३ मि.मी. लांब व ०.१ ते ०.१५ मि.मी. रुंद असतात.

अळी : अळीला पाय नसतात. डोकेही स्पष्ट दिसत नाही. नुकतीच बाहेर पडलेली अळी पारदर्शक असते. परंतु पुढील अवस्थेत तिचा रंग पिवळसर-केशरी होतो. पूर्ण वाढ झाल्यावर अळी साधारणतः ३ मि.मी. लांब होते. शरीरावर काही ठिकाणी काळसर व तपकिरी कोरडी डागांसारखी चिन्हे असतात.





कोष : कोष आकाराने लांबट-गोलाकार असून, स्पष्टपणे खंडित व खालच्या बाजूस किंचित चपटसर असतो. त्याचा आकार साधारणतः १.३ ते २.३ मि.मी. लांब व ०.५ ते ०.७५ मि.मी. रुंद असतो. रंग बदलत असून सुरुवातीला फिकट पिवळसर-केशरी, नंतर पुढे सोनसळी तपकिरी होतो.

प्रौढ माशी : प्रौढ कीड ही अतिशय लहान माशी असते. नर माशीच्या शरीराची लांबी साधारण १.० ते १.३ मि.मी., तर मादीची लांबी १.७ मि.मी. असते. प्रौढ कीड करडसर-तपकिरी ते गडद तपकिरी दिसते, मात्र डोके व छाती पोटाच्या तुलनेत किंचित फिकट रंगाची असतात. पोट मुख्यतः काळसर असून बाजूंना पिवळसर छटा आढळते. पाय पिवळसर असतात. पंखांवर, विशेषतः पहिल्या व दुसऱ्या शिरेवर सलग केसांची रांग दिसते. डोके रुंदीला लांबीपेक्षा मोठे असून, त्यावर रेखीय-जाळ्यासारखी रचना आढळते. डोळे मोठे व लालसर ते गडद दिसतात. डोळ्यांच्या मागे काही लांब केस असतात. शृंगिका तीन खंडांची असून सर्व खंड तपकिरी-पिवळ्या रंगाचे असतात. तिसरा खंड सूक्ष्म, पण स्पष्ट केसाळ असतो.

नुकसानीचे स्वरूप : किडीच्या अळ्या पानांच्या आतील पेशीमध्ये बोगदे (सुरंग) तयार करून खातात. पानांमध्ये या किडीच्या अळ्या फिरताना वाकड्या-तिकड्या वळणदार रेषा (माइन्स) तयार झालेल्या दिसतात. या रेषा प्रामुख्याने पांढऱ्या किंवा फिकट हिरव्या रंगाच्या असतात, तर काही ठिकाणी काळपट किंवा तपकिरी सुकलेल्या डागांसह दिसतात. जसजशा अळ्या मोठ्या होतात, तसतसे हे बोगदे अधिक रुंद व मोठे होतात. त्यामुळे पाने कोरडी पडतात, निरोगी पेशींची संख्या कमी होते. पानांची प्रकाशसंश्लेषण करण्याची क्षमता घटते. परिणामी पाने अकाली गळतात, वाढ खुंटते आणि उत्पादनात घट येते. अप्रत्यक्ष नुकसान म्हणून या बोगद्यांमुळे पानांमध्ये बुरशी व जिवाणूजन्य रोगांचा प्रादुर्भाव होऊ शकतो. अशा स्थितीत झाडे अधिक कमकुवत बनतात. या किडीमुळे टोमॅटो पिकात रोपावस्थेत सुमारे ४६ ते ७० टक्के नुकसान, पानांवर सुमारे ९० टक्के नुकसान व अंतिम उत्पादनात जवळपास ७० टक्के घट दिसून येते.

पोषक वातावरण : नागअळीच्या प्रादुर्भावासाठी उष्ण, कोरडे आणि कमी आर्द्रतेचे हवामान अत्यंत पोषक ठरते. तापमान जास्त व आर्द्रता कमी असताना अळींची वाढ जलद होते. पानांमध्ये सुरंगांची संख्या वाढते. पावसाचे प्रमाण कमी राहिल्यास किंवा पावसात खंड पडल्यास अळीचे जीवनचक्र अधिक वेगाने पूर्ण होते. दिवसाचे तापमान जास्त आणि रात्रीचे तापमान तुलनेने कमी असल्यास किडीचा प्रसार वेगाने वाढून प्रादुर्भाव तीव्र स्वरूप धारण करतो.

एकात्मिक व्यवस्थापन : वाकडी पाने असलेल्या टोमॅटो वाणांवर या किडीचा प्रादुर्भाव तुलनेने कमी होतो. लागवडीसाठी अशा प्रतिकारक्षम टोमॅटो वाणांची निवड करावी. लागवडीसाठी कीडविरहित रोपांची लागवड करावी. पीक फेरपालट करावी. टोमॅटो काढून झाल्यावर फेरपालट करताना सोलानेसी, ॲस्टरेसी, कुकुर्बिटेसी व फॅबेसी कुटुंबातील पिके घेऊ नयेत. किडीचा प्रादुर्भाव ओळखण्यासाठी पिवळ्या चिकट सापळ्यांचा वापर करावा व प्रादुर्भाव नियमितपणे तपासावा. खतांचा संतुलित वापर करावा. पिकास पाण्याचा ताण पडू देऊ नये. चंदेरी रंगाच्या परावर्तित आच्छादनाचा वापर केल्यास प्रादुर्भाव कमी आढळला आहे. शेतात शेपू, कोथिंबीर किंवा बडीशेप लावल्यास उपयुक्त मित्रकीटकांना आश्रय मिळतो. शेतीभोवती तुळस, झेंडू किंवा शेवंती यासारखी झाडे लावल्यास या किडीचा प्रादुर्भाव कमी होतो. ट्रायकोग्रॅमा प्रेटिओसम या अंडी अवस्थेवर उपजीविका करणाऱ्या परजीवी कीटकासबोतच अन्य नेसिडिओकोरिस टेन्यूस, मॅक्रोलोफस पायग्मेयस यासारख्या परभक्षी कीटकांचे संवर्धन करावे. कडुनिंबयुक्त कीटकनाशक - ॲझाडिरेक्टीन (१० हजार पी.पी.एम.) २ मि.लि. प्रति लिटर पाणी याप्रमाणे प्रतिबंधात्मक फवारणी करावी. यासाठी रासायनीक पद्धतीनेही नियंत्रण करता येते.

# दिन विशेष

### महत्वाच्या घटना

५४ : नीरो १७ व्या वर्षी रोमन सम्राट बनला.

१७७३ : चार्ल्स मेसियर यांनी व्हर्लपूल गॅलेक्सीचा शोध लावला.

१८८४ : लंडन शहराजवळील ग्रिनिच या गावाजवळून जाणारे रेखावृत्त शून्य मानणे या गोष्टीला आंतरराष्ट्रीय मान्यता मिळाली व त्यानुसार सर्व जगाची वेळ निश्चित केली गेली.

१९२३ : मुस्तफा कमाल पाशाने तुर्कस्तानची राजधानी इस्तंबूल वरुन अंकारा येथे हलवली.

१९२९ : पुण्यातील पर्वती देवस्थान दलितांना खुले झाले. त्यासाठी सत्याग्रह झाला होता.

१९४४ : दुसरे महायुद्ध लाल सैन्याने लाटवियाची राजधानी रिगा जिंकली.

१९४६ : फ्रान्सने नवीन संविधान अंगीकारले.

१९७० : फिजीचा संयुक्त राष्ट्रांत प्रवेश

२०१३ : मध्य प्रदेश मध्ये झालेल्या चेंगराचेंगरीत ११५ जण ठार आणि ११० जण जखमी झाले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८७७ : भुलाभाई देसाई स्वातंत्र्यसेनानी व कायदेपंडित, त्यांनी होमरुल चळवळीतील कार्यकर्ते, १९३१ मधे 'गांधी-आयर्विन' कराराप्रमाणे त्यांनी बार्डोलीच्या शेतकऱ्यांची बाजू मांडली. १९३२ मध्ये कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेतल्याबद्दल त्यांना एक वर्षाचा कारावास व दहा हजार रुपये दंड अशी शिक्षा झाली होती. (मृत्यू: ६ मे १९४६ )

१९११ : अशोक कुमार गांगूली ऊर्फ 'दादामुनी' चित्रपट अभिनेते, पद्मश्री (१९६२), दादासाहेब फाळके पुरस्कार (१९८९), ५३ वर्षांच्या प्रदीर्घ कारकिर्दीत सुमारे ४०० चित्रपटांत भूमिका केल्या (मृत्यू: १० डिसेंबर २००१)

१९२४ : भारतीय राजकारणी मोतीरु उदयम यांचा जन्म. (मृत्यू: ३१ मार्च २००२)

१९२५ : मार्गारेट थॅचर ब्रिटनच्या पहिल्या महिला पंतप्रधान (मृत्यू: ८ एप्रिल २०१३)

१९३६ : भारतीय वीणा वादक आणि संगीतकार चित्ती बाबू यांचा जन्म. (मृत्यू: ९ फेब्रुवारी १९९६)

१९४१ : जॉन स्नो इंग्लिश क्रिकेटपटू

१९४३ : सऊबर एफ १ चे संस्थापक पीटर सऊबर यांचा जन्म.

१९४८ : नुसरत फतेह अली खान पाकिस्तानी सूफी गायक (मृत्यू: १६ ऑगस्ट १९९७)

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१२८२ : जपानमधील निचिरेन बौद्ध पंथाचे स्थापक निचिरेन यांचे निधन. (जन्म: १६ फेब्रुवारी १२२२)

१२४० : रझिया सुलतान भारतातील पहिली महिला राज्यकर्ती (जन्म: ?? १२०५)

१९११ : मार्गारिट नोबल ऊर्फ 'भगिनी निवेदिता' स्वामी विवेकानंदांच्या शिष्या, भारतीय संस्कृतीच्या आणि स्वातंत्र्याच्या पुरस्कर्त्या, त्या मूळच्या आयरिश होत्या. २५ मार्च १८९८ रोजी स्वामी विवेकानंदांनी त्यांना विधिवत ब्रम्हचारिणी व्रताची दीक्षा दिली व त्यांचे नाव 'निवेदिता' ठेवले. (जन्म: २८ आक्टोबर १८६७)

१९३८ : पॉपॉय कार्टून चे निर्माते ई. सी. सेगर यांचे निधन. (जन्म: ८ डिसेंबर १८९४)

१९४५ : मिल्टन हर्शे 'द हर्शे चॉकलेट कंपनी'चे संस्थापक (जन्म: १३ सप्टेंबर १८५७)

१९६५ : डी. डी. टी. या पदार्थाचा अनेक कीटकांवर संपर्कजन्य विषारी परिणाम होतो या शोधाबद्दल नोबेल पारितोषिक मिळवणारे स्विस रसायनशास्त्रज्ञ पॉल हर्मन म्युलर यांचे निधन. (जन्म: १२ जानेवारी १८९९ ओल्टेन, स्वित्झर्लंड)

१९८७ : आभा सकुमार गांगुली तथा किशोर कुमार पार्श्वगायक, संगीतकार, गीतकार, निर्माता, दिग्दर्शक, आभिनेता व पटकथालेखक, त्यांनी सुमारे ४०० हून अधिक चित्रपटांत गाणी गायिली. 'चलती का नाम गाडी' सारख्या निखळ विनोदी चित्रपटाबरोबरच 'दूर गगन की छाँव में' सारखे गंभीर चित्रपटही काढले. (जन्म: ४ ऑगस्ट १९२९)

१९९५ : डॉ. रामेश्वर शुक्ल तथा 'अंचल' हिन्दी साहित्यिक (जन्म: १ मे १९१५ किशनपूर, फतेहपूर, उत्तर प्रदेश)

२००१ : डॉ. जाल मिनोचर मेहता कुष्ठरोगतज्ज्ञ, नामवंत शल्यचिकित्सक, पुणे जिल्हा रेड क्रॉसचे अध्यक्ष, पद्मश्री (१९८२) 'सिरम इन्स्टिट्युट ऑफ इंडिया' चे संचालक

२००३ : नोबेल पारितोषिक विजेते केनेडियन भौतिकशास्त्रज्ञ बर्ट्राम ब्रॉकहाउस यांचे निधन.

# सुरक्षितपणे साठवा कांदा-लसूण ; शासन देत आहे ५० टक्के अनुदान

महाराष्ट्र राज्य फलोत्पादन व औषधी वनस्पती मंडळाच्या एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानाअंतर्गत, कांदा व लसूण सुरक्षित साठवण्यासाठी साठवणूक गृह उभारणीसाठी ५० टक्के अनुदान मिळणार आहे. महाराष्ट्र राज्य फलोत्पादन व औषधी वनस्पती मंडळाच्या माध्यमातून एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान राबविण्यात येत आहे.

या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांसाठी कांदा आणि लसूण साठवणुकीसाठी अत्याधुनिक साठवणूक गृह उभारण्यासाठी शासनाकडून मोठ्या प्रमाणावर अर्थसहाय्य दिले जाते. या योजनेचा उद्देश शेतकऱ्यांना कांदा व लसूण तांत्रिक पद्धतीने साठवण्याची सुविधा उपलब्ध करून देणे आणि बाजारात योग्य वेळी व योग्य दराने पुरवठा सुनिश्चित करणे हा आहे.

ही योजना वैयक्तिक शेतकरी, महिला गट, सहकारी संस्था आणि उत्पादक संघासाठी खुली आहे, ज्यामुळे उत्पादन जास्त काळ टिकवता येईल आणि बाजारात योग्य दर मिळवता येईल.

लाभार्थी निकष काय? : या योजनेचा लाभ घेण्यासाठी खालील अटी पूर्ण करणे आवश्यक आहे:

अर्जदार शेतकऱ्याकडे स्वतःच्या मालकीची जमीन असावी. त्या जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावर कांदा पिकाची नोंद असणे बंधनकारक आहे. शेतकऱ्याकडे प्रत्यक्ष कांदा पीक असणे आवश्यक आहे.

ही योजना यांच्यासाठी आहे : वैयक्तिक शेतकरी. शेतकऱ्यांचे गट / स्वयंसहाय्यता गट. महिला शेतकरी गट. उत्पादक कंपनी / सहकारी संस्था / सहकारी पणन संघ. नोंदणीकृत शेतीसंबंधी संस्था.

तांत्रिक निकष काय ? : साठवणूक गृह जमिनीपासून किमान ६० सें.मी. उंचीवर असावे. चाळीची दिशा दक्षिण-उत्तर ठेवावी; मात्र ज्या भागात पर्जन्यमान अधिक आहे.

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत

# अतिवृष्टीच्या अंधारात औसा मतदारसंघात आशेचा दीप

## आ.अभिमन्यू पवार यांच्या पुढाकाराने क्रीएटीव्ह फाउंडेशन आणि अभय भुतडा फाउंडेशनच्या माध्यमातून सव्वा कोटीची मदत

लातूर । प्रतिनिधी

अतिवृष्टीमुळे औसा मतदारसंघातील शेतकऱ्यांवर आणि ग्रामस्थांवर मोठे संकट ओढावले असताना, दिवाळीपूर्वी त्यांच्या घरात आशेचा नवा दीप उजळला आहे. आमदार अभिमन्यू पवार यांच्या पुढाकाराने क्रीएटीव्ह फाउंडेशन आणि अभय भुतडा फाउंडेशन यांच्या माध्यमातून १२०० कुटुंबांना सुमारे सव्वा कोटी रुपयांची थेट आर्थिक आणि अन्नधान्य स्वरूपातील मदत जाहीर करण्यात आली आहे. ही मदत १५ ऑक्टोबर रोजी ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर आणि कृषिरत्न बी.बी. ठोंबरे यांच्या हस्ते वितरित होणार आहे. औसा तालुक्यातील अनेक गावांमध्ये अतिवृष्टीमुळे पिकांचे, जनावरांचे आणि घरगुती वस्तूंचे मोठे नुकसान झाले आहे.

या पार्श्वभूमीवर आमदार पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, कृषीमंत्री दत्ता भरणे आणि पालकमंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्याकडे पाठपुरावा करून ३१,००० कोटी रुपयांची ऐतिहासिक शासकीय नुकसानभरपाई जाहीर करून घेतली. या



पार्श्वभूमीवर औसातील शासकीय विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत आमदार पवार यांनी औसा पॅटर्न, मदतीचा कार्यभाग आणि विकासाचा लेखाजोखा मांडला. ते म्हणाले, ही मदत म्हणजे केवळ पैसे नाहीत, तर संकटातून उभं राहण्यासाठीचा आत्मविश्वास आहे. कोणतीही बँक शासकीय नुकसानभरपाई थकबाकीच्या नावाखाली कपात करू शकत नाही, असा प्रकार झाल्यास थेट जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार करावी. बैल दगावला तर पुन्हा बैल घ्या, गाय गमावली तर गायच घ्या हीच खरी मदतीची दिशा आहे, असे सांगत त्यांनी शेतकऱ्यांना भावनिक आवाहन केले. औसा मतदारसंघातील बदल तुम्ही स्वतः अनुभवावा आणि समाजापर्यंत पोहोचवावा, असेआवाहन त्यांनी पत्रकारांना केले. या पत्रकार परिषदेस या पत्रकार परिषदेस कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती चंद्रशेखर सोनवणे, उपसभापती भीमाशंकर राचट्टे, तालुकाप्रमुख सुभाष जाधव, औसा मंडळ अध्यक्ष शिव मुरगे, प्रा सुधीर पोतदार, माजी शहराध्यक्ष लहू कांबळे, कल्पना डांगे, अक्रम खान, नाना धुमाळ, वृषाल देशमुख, यांनी प्रविण कोपरकर, सदाशिव जोगदंड यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. एक हात मदतीचा, विचार माणुसकीचा या भावनेतून साकारलेला औसा पॅटर्न आता समाजसेवेचा प्रेरणादायी आदर्श बनला आहे. दिवाळीपूर्वी १२०० कुटुंबांच्या घरात प्रकाश देणारी ही मदत औसा तालुक्यातील नव्या आशेचा दीप ठरली आहे.



# १ किलो गांजासह एक आरोपी जेरबंद

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

जालना । प्रतिनिधी

अंमली पदार्थ विक्री करणारे इसमांविरुध्द कारवाई करणे बाबत पोलीस अधीक्षक येणे दिलेल्या आदेशावरून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला पोलीस ठाणे बदनापुर हद्दीमध्ये एक इसम स्कुटीवर गांजा विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती प्राप्त झाली होती. त्यावरुन रात्री स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शासकीय पंचासमक्ष पोलीस ठाणे बदनापुर हद्दीतील सेवानगर तांडयाजवळछापा कारवाई करुन अजय आनंद कोळी याचे ताब्यातुन ०१ किलो ३०० ग्रॅम मादक पदार्थ गांजा जप्त करण्यात आला आहे.

सदर आरोपीने गुन्हयात वापरलेली /२०//४३६६ क्रमांकाची स्कुटी, एक गांजा मोजण्यासाठी वापरण्यात येणारा इलेक्ट्रॉनिक काटा असे एकुण ०१,१४,३००/- रु किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. पोहेकॉ रुस्तुम जैवाळ स्था.गु.शा. जालन यांचे तक्रारी वरुन नमुद इसमाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कारवाई श्री. अजय कुमार बंसल पोलीस अधीक्षक, श्री. आयुष नोपाणी, अपर पोलीस अधीक्षक, अनंत कुलकर्णी यांचे मार्गदर्शनाखाली श्री. पंकज जाधव पोलीस निरीक्षक स्था.गु.शा. पोउपनि. राजेंद्र वाघ, सफौ रामप्रसाद पव्हरे, पोलीस अंमलदार रुस्तुम जैबाळ, कैलास खार्डे, लक्ष्मीकांत आडेप, रमेश राठोड, देविदास भोजने, भागवत खरात, कैलास चेके, सचिन राऊत, वाहन चालक सौरभ मुळे यांनी केली आहे.

# कर्जबाजारी शेतकऱ्याने गळफास घेऊन जीवन संपवले!

## पुर्णा तालुक्यात अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान; आठवड्यांत २ शेतकऱ्यांचा मृत्यू



परभणी । प्रतिनिधी

तालुक्यातील आडगाव-सुगाव येथे अतिवृष्टीमुळे खरीप पिकांचे मोठे नुकसान झाल्याने आणि बँकेच्या पीक कर्जाच्या ताणाला कंटाळून एका ५० वर्षीय शेतकऱ्याने राहत्या घरी गळफास घेऊन जीवन संपविले. ही घटना शनिवारी (दि. ११) रात्री उघडकीस आली. रामराव किशनराव पिडगे (वय ५०, रा. आडगाव-सुगाव) असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, पिडगे यांच्या आडगाव-लासिना शिवारात सुमारे तीन ते चार एकर शेती आहे. सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे त्यांच्या शेतातील खरीप पिक पूर्णपणे नष्ट झाले. याच जमिनीवर त्यांनी राष्ट्रीयकृत बँकेचे पीक कर्ज घेतले होते. पिकांचे नुकसान झाल्याने कर्जफेडीचा ताण वाढला होता. या आर्थिक संकटामुळे आणि अतिवृष्टीच्या फटक्यामुळे ते नैराश्यात गेले होते. शनिवारी रात्री त्यांनी राहत्या घरी खिडकीच्या आडोशाला गळफास लावला. या घटनेची माहिती मिळताच चुडावा पोलिस ठाण्याचे सपोनि सुशांत किनगे आणि पोलिस कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला.

मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठविण्यात आला. पिडगे यांच्या पश्चात आई, पत्नी आणि तीन मुले असा परिवार आहे. या घटनेमुळे आडगाव-सुगाव परिसरात शोककळा पसरली आहे. अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान झाल्याने याआधी ४ ऑक्टोबररोजी मरसूळ येथील शेतकरी चांदू काशिराम शिंदे यांनी धावत्या रेल्वेसमोर उडी मारली होती. आता आडगाव-सुगाव येथील ही दुसरी घटना घडल्याने शेतकऱ्यांमधील अस्वस्थता अधिक वाढली आहे.

# धाराशीवला अतिवृष्टीचा फटका ; हेक्टरी फक्त ४७ किलो सोयाबीन

धाराशीव । प्रतिनिधी

यावर्षी धाराशिव जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे कसे कंबरडे मोडले आहे, याचे धक्कादायक वास्तव लोहारा तालुक्यातील भातागळी येथील एका पीक कापणी प्रयोगातून समोर आले आहे. दहा बाय पाच मीटरच्या चौरसातून केवळ २४५ ग्रॅम सोयाबीनचे उत्पादन निघाल्याने उपस्थित अधिकारी आणि शेतकरीही चक्रावून गेले. या आकडेवारीनुसार हेक्टरी केवळ ४७ किलो सोयाबीन उत्पादन होणार असल्याचे स्पष्ट झाले असून, हे शेतकऱ्यांवरील आसमानी संकटाचे बोलके उदाहरण ठरले आहे.

सध्या जिल्ह्यात प्रधानमंत्री पीक विमा योजना २०२५ अंतर्गत खरीप पिकांचे



पीक कापणी प्रयोग सुरू आहेत. नवीन नियमांनुसार, ५०% नुकसान भरपाई पीक कापणी प्रयोगाच्या आधारावर तर ५०% उपग्रहाद्वारे घेतलेल्या छायाचित्रांच्या आधारावर निश्चित केली जाणार आहे. यामुळे या प्रयोगांना अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. आयसी आयसी लोम्बार्ड पीक विमा कंपनीचे प्रतिनिधी श्री. बी. एन. बागल यांच्या उपस्थितीत वजनाची नोंद घेण्यात आली. या अत्यल्प उत्पादनामुळे शेतकऱ्यांना आता पीक विम्याच्या नुकसान भरपाईतून मोठ्या मदतीची अपेक्षा आहे. यावेळी पीक विमा अभ्यासक व शेतकरी नेते अनिल जगताप (भातागळी), मंडळ कृषी अधिकारी एन. एन. मगर, उप कृषी अधिकारी जे. के. गोसावी, सहाय्यक कृषी अधिकारी के. एम. जाधव, जे. एस. पवार, व्ही. पवार, ग्रामपंचायत अधिकारी आर. आर. बोयने, महसूल अधिकारी एम. जी. माळी, सरपंच हनुमंत जगताप, ग्रामपंचायत सदस्य तानाजी आनंदगावकर, शेतकरी अमोल ओवंडकर, विश्वनाथ जगताप, वसंत गर्जे, राजेंद्र जगताप आणि शेतमालक शशिकांत कुलकर्णी उपस्थित होते.

# ज्या शेतकऱ्यांनी पिकवलेले अन्न एवढे वर्षे खाल्ले त्यांच्या उध्दारासाठी यापुढे काम करणार-गांधी

परळी । प्रतिनिधी

शेतकरी राबराब राबतात, शेतात घाम गाळतात आणि त्यानंतर त्यांनी पिकवलेले अन्नधान्य जगाला जगवते, म्हणूनच त्याला जगाचा पोशिंदा म्हटले जाते. मीही आयुष्याची एवढी वर्षे शेतकऱ्यांनी पिकवलेले अन्नधान्य खाल्ले आहे. या ऋणातून उतराई होण्यासाठी मी उरलेले आयुष्य खर्च करणार असून, शेतकऱ्यांच्या उत्पन्न वाढीसाठी काम करणार असल्याचे प्रतिपादन ग्लोबल विकास ट्रस्टचे अध्यक्ष मयंक गांधी यांनी केले. परळी वैजनाथ तालुक्यातील मौजे बोरखेड तसेच तेलसमुख येथे पुरपरिस्थितीमुळे नुकसान झालेल्या शेतकरी कुटूंबांना किराणा किटचे वाटप करण्यात आले, याप्रसंगी ते बोलत होते.



परळी वैजनाथ तालुक्यातील मौजे बोरखेड तसेच तेलसमुख येथे पुरग्रस्त शेतकरी कुटूंबांना ग्लोबल विकास ट्रस्टकडून किराण किटचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी दोन्हीही गावातील शेकडो नागरीकांची मोठ्या संख्येने उपस्थितीती होती. परंपारीक शेतीत बदल करून कुठेतरी आता शाश्वत शेतीकडे वळण्याची गरज निर्माण झालेली आहे. सोयाबीन, कापूस, ऊस आदी पिके ही घ्यायची म्हणून शेतकरी घेतात, मात्र हिशोब केला तर त्यातून कवडीचेही उत्पन्न मिळत नाही. वर्षानुवर्षे तोट्यातील शेतकरी कर्जाच्या अगदी खाईत जात आहेत. त्यावर उपाय म्हणून केळी, अंबा, सिताफळ, तुती अशा पिकांकडे शेतकऱ्यांनी वळले पाहीजे. ग्लोबल विकास ट्रस्टकडून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना फळबाग लागवडीबाबत मोफत प्रशिक्षण देण्यात येते. आजघडीला जवळपास ३० हजार पेक्षा जास्त शेतकरी ग्लोबल विकास ट्रस्टसोबत जोडल्या गेलेले आहेत. त्या सर्व शेतकऱ्यांच्या कुटूंबाची अर्थव्यवस्था पूर्वीपेक्षा जास्त सुधारली असून, आज ते समाधानी जीवन जगत आहेत. येणाऱ्या काळात फळपिक लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांना आवश्यक असलेली सर्वतोपरी मदत करण्याचा आमचा संकल्प असून, शेतकऱ्यांनी सिरसाळा येथील कृषीकूलमध्ये यावे. तेथील उपलब्ध सर्व बाबींचा अभ्यास करावा आणि येणाऱ्या काळात फायदा करून घ्यावा असे आवाहन ग्लोबल विकास ट्रस्टचे अध्यक्ष मयंक गांधी यांनी शेतकऱ्यांना केले आहे.

# मनपा कर्मचाऱ्यांसह कंत्राटी कामगारांना दिवाळी सणानिमित्त बोनस द्या!

## सगळ्याच कर्मचारी संघटनांची महानगरपालिका प्रशासनाकडे एकत्रीत मागणी

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

दिवाळी सणाला अवघा एक आठवडा उरला असताना महापालिकेतील कायम व कंत्राटी कर्मचाऱ्यांकडून बोनस आणि सणानिमित्त इतर सुविधांची जोरदार मागणी करण्यात आली आहे. विविध कर्मचारी संघटनांनी प्रशासनाकडे मागण्यांचा पाऊस पाडला असून, बोनसपासून ते आरोग्य तपासणीपर्यंत अनेक मागण्या पुढे करण्यात आल्या आहेत.

दिवाळी सणानिमित्त महापालिकेतील कर्मचाऱ्यांना दिवाळी बोनस २० हजार रुपये, तसेच फेस्टिव्हल ॲडव्हान्स ३० हजार रुपये देण्याची मागणी कृष्णा बनकर यांच्या बहुजन शक्ती कामगार संघटनेने केली आहे. यासोबतच सफाई कर्मचाऱ्यांना सुट्टीच्या दिवसांचा मोबदला रोखीने अदा करावा, सेवानिवृत्त




कर्मचाऱ्यांना निवृत्तीच्या दिवशीच सर्व देयके देण्यात यावीत, अशी मागणी संघटनेने केली आहे. तसेच दर तीन महिन्यांनी सफाई कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी व्हावी, ड्रेसकोड आणि नेमप्लेट सक्तीची करण्यात यावी, तसेच हजेरी केंद्र बांधून द्यावीत, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत. तसेच महाराष्ट्र दर्शन योजना पुन्हा सुरू करावी, ४५ वर्षांवरील सफाई कर्मचाऱ्यांना हलके काम देण्यात यावे आणि कंत्राटी कर्मचाऱ्यांनाही बोनस व सानुग्रह अनुदानाचा लाभ द्यावा, अशा विविध मागण्या करण्यात आल्या आहेत. दरम्यान, संजय रगडे यांच्या बहुजन कामगार शक्ती महासंघाने कायम कर्मचाऱ्यांना १५ हजार रुपये बोनस आणि कंत्राटी कर्मचाऱ्यांना ८.३३ टक्के दराने बोनस देण्याची मागणी केली आहे. कायम कर्मचाऱ्यांना २० हजार रुपये फेस्टिव्हल ॲडव्हान्स, सफाई कर्मचाऱ्यांना निवासाची सोय, सुटीचे पैसे तत्काळ अदा करणे, व आकृतिबंधानुसार मुकादम पदावर पदोन्नती देणे, अशा मागण्या महासंघाने केल्या आहेत. महासंघाने ज्येष्ठतेनुसार उपायुक्तांपासून लिपिक पदापर्यंत पदोन्नती प्रक्रिया पारदर्शकपणे राबवावी, अशीही मागणी प्रशासनाकडे केली आहे.

# रेणुकामातेच्या मंदिराचे भूमिपूजन



अंबड । प्रतिनिधी

शहरातील श्री साई बालाजी रेसिडेन्सी येथे रेणुका मातेच्या मंदिराचे भूमिपूजन योगेश जोशी यांच्या विधिवत पूजेने उद्धव जाधव यांच्या हस्ते नुकतेच पार पडले. शहरात कोठेही रेणुका मातेचे मंदिर नसल्याने अनेक भाविक भक्तांची अंबड शहरात रेणुका मातेचे मंदिर व्हावे अशी इच्छा होती. मात्र जागा अभावी आजपर्यंत रेणुका मातेचे मंदिर शहरात होऊ शकले नाही.

सर्वे नंबर ३/२ च्या जागेचे मूळ मालक ॲड. - केदार द्वारकादास मंत्री यांनी त्यांच्या श्री साई बालाजी रेसिडेन्सी मधील रहिवाशी असलेल्या सावित्राबाई रामेश्वर सोळुंखे व इतर लोकांच्या मागणीप्रमाणे मंत्री यांनी एक धार्मिक कार्य पूर्ण होत असल्याने रेणुका मातेच्या मंदिरासाठी जागा उपलब्ध करून देऊन भूमिपूजनाला उपस्थिती दर्शवली. यावेळी ॲड. केदार मंत्री, माजी उपनगराध्यक्ष केदार कुलकर्णी, गोकुळ महाराज, ज्ञानेश्वर घुगे, सावित्राबाई सोळुंके, सौ. मिनाबाई कारके, सुनिता सोळुंके, सविता सकट, निळकंठ सोळुंखे, शहरातील नागरिक व रेसिडेन्सी कॉलनी मधील अनेक महिला व पुरुष उपस्थित होत्या

# आ. संदीप क्षीरसागर यांच्या पाठपुराव्याला यश

## बायपासच्या दोन पुलांची बांधणी आणि स्लिप सर्विस रस्त्याच्या कामाला सुरुवात

बीड । प्रतिनिधी

**बीड शहरातून जात असलेल्या आणि उत्तर दक्षिण जोडणारा धुळे सोलापुर महामार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक असते. यात जड वाहतकीचे प्रमाण देखील जास्त असते. धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर बायपास रस्त्यावरील शहरात वळणावर नेहमी अपघात होत होते. यामुळे संभाव्य अपघात टळले पाहिजेत आणि नागरिकांचे जीव वाचले पाहिजेत त्यामुळे या वळणावर पुलांची बांधणी आणि स्लिप सर्विस रस्त्याची जोडणी अत्यंत महत्त्वाची होती.**



त्या दोन्ही ठिकाणी पुलांची बांधणी व १२ किलोमीटर च्या रस्त्यावर स्लिप सर्व्हिस रस्ता जोडणीच्या कामाला प्रत्यक्षात सुरूवात झाली. या कामासाठी आ.संदीप क्षीरसागर यांनी केंद्रीय रस्ते विकासमंत्री नितीन गडकरी यांच्याकडे पाठपुरावा केला होता.

बीड विधानसभेचे आ.संदीप भैया क्षीरसागर यांनी या सुरू झालेल्या कामाच्या ठिकाणी जाऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी कामासंदर्भात संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना योग्य त्या सूचना करत व सुरू झालेले काम लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी सूचना दिल्या.

आ.संदीप भैया आणि सय्यद सलीम यांनी खंडपीठात पिटीशन केली होती दाखल

आ.संदिप क्षीरसागर व माजी आमदार सय्यद सलीम यांनी उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठामध्ये यासंदर्भात पिटीशन दाखल केली होती.संदीप क्षीरसागर यांनी या कामाच्या मंजुरीची शिफारस राज्य शासनाने केंद्र शासनाकडे करावी अशी वारंवार मागणी केली होती.तसेच माजी आ.सय्यद सलीम यांनी दोन्ही उड्डाणपूल आणि स्लिप सर्विस रोड मंजुरीसाठी मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात याचिका क्रमांक ११७६/२०२४ व पीटिशन क्रमांक ८८०८/२०२४ दाखल केली होती. याठिकाणी होत असलेले अपघात बघता आणि सुरक्षेच्या प्रश्नांची गंभीर दखल घेत डिसेंबर २०२४ मध्ये तिन्ही कामांना मंजुरी द्या असे निर्देश दिले होते.त्यांच्या या निर्णयाने बायपास वरील सुरक्षेचा प्रश्न मार्गी लागणार असून आ.संदीप क्षीरसागर आणि माजी आ.सय्यद सलीम यांच्या प्रयत्नांना यश आले आहे.

## मा. जि. प सदस्य भगवानराव तात्या खेडकर यांचे निधन

गेवराई । प्रतिनिधी



चकलांबा येथील माजी जिल्हा परिषद सदस्य भगवानराव खेडकर पाटील यांचे व्या वर्षी दि.१२ ऑक्टोबर २०२५ रविवार रोजी सकाळी ६:३० मि.वाजता दुःखद निधन झाले.चकलांबा आणि परिसरातील राजकारणात किंगमेकर म्हणून ओळखले जाणारे तात्या हे अत्यंत प्रेमळ आणि शांत स्वभावाचे एक आदर्श व्यक्तिमत्व होते. स्वर्गवासी गोपीनाथराव मुंडे साहेबांचे ते अखंड विश्वासू आणि सहकारी होते.ते सलग १५ वर्ष जिल्हा परिषद सदस्य आणि सरपंच पदाचा कार्यकाळ घोषावला.सर्व समाजांना सर्वांना सोबत घेऊन चालणारे तात्या होते.

एक आदर्श जीवन कुठलाही पक्षपात न करता कोणाचीही बाजू न घेता निपक्षपातीपणाने संयमाच आणि राजकारणाच्या पलीकडचं समाजकारण करण्याची त्यांची खुप ओढ. समाजकारण,राजकारण आणि गावच्या प्रत्येक माणसाचे त्यांचे अतूट संबंध होते. धार्मिक क्षेत्रात गावातल्या कोणत्याही मंदिराचे बांधकाम असो कोणताही कार्यक्रम असो वकिंवा सप्ताह असो तात्यांनी गावकऱ्यांना सर्व समाजाला सर्वांना सोबत घेऊन ही समाजसेवा आणि गावची सेवा तात्यांनी केलेली आहे. गावातील कुठलेही पान २ वर

## वंजारी समाजाचा एसटी प्रवर्गात समावेश करा, मागणीसाठी आंदोलन

बीड । प्रतिनिधी

हैदराबाद गॅझेटनुसार वंजारी समाजाचा एसटी प्रवर्गामध्ये समावेश करण्यात यावा या मागणीसाठी वंजारा समाजाच्या वतीने आज रविवारी संत भगवान बाबा चौकामध्ये आंदोलन करण्यात आले

राज्यात मराठा समाजाला आरक्षण देताना हैदराबाद गॅजेट लागू करण्यात आले अनेक मराठा समाजाचा कुणबी म्हणून उल्लेख आढळला त्यांना ओबीसी मध्ये समावेश करून घेण्याची प्रक्रिया पूर्ण झाली विशेष म्हणजे याच गॅजेटमध्ये वंजारी समाज हा एसटी प्रवर्गामध्ये येत असल्याने आता त्याच गॅझेटनुसार वंजारी समाजाचा एसटी प्रवर्गामध्ये समावेश करण्यात यावा या मागणीसाठी गेल्या काही महिन्यापासून ठिकठिकाणी आंदोलने सुरू आहेत त्याचाच एक भाग म्हणून आज सकाळी संत भगवान बाबा चौकामध्ये सकल वंजारी समाजाच्या वतीने आंदोलन करण्यात आले हातामध्ये स्वर्गीय गोपीनाथ मुंडे संत भगवान बाबा यांच्या प्रतिमा असलेले फोटो फलक घेण्यात आले होते त्याचबरोबर आरक्षण आमच्या हक्काचे नाही कुणाच्या बापाचे देत कसे नाहीत दिलेच पाहिजे या घोषणे बरोबरच स्वर्गीय गोपीनाथ मुंडे संत भगवान बाबा यांच्याही नावाने घोषणा देत आंदोलन करण्यात आले माऊली शिरसाट मोहन आघाव केशव तांदळे यांच्या मार्गदर्शनाखाली हे आंदोलन करण्यात आले होते या आंदोलनात मोठ्या संख्येने वंजारी समाज बांधव उपस्थित होते आंदोलनादरम्यान काही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता




## जयभवानीच्या कार्यक्षेत्रातील उसाचे गाळप करण्यास आम्ही कटिबद्ध-अमरसिंह पंडित

गेवराई । प्रतिनिधी

जयभवानी सहकारी साखर कारखाना कार्यक्षेत्रात १३ ते १४ लाख मेट्रीक टन ऊस उपलब्ध आहे. त्यापैकी कार्यक्षेत्रातील १४६५६ हेक्टर क्षेत्राची नोंद कारखान्याकडे झालेली असून अंदाजे १० ते ११ लाख मेट्रिक टन ऊस गाळपास उपलब्ध होणार आहे. कारखान्याने चालू गळीत हंगामात ९ लाख मेट्रीक टन ऊस गाळपाचे व सरासरी ११ टक्के साखर उताऱ्याचे उदिष्ट ठरवीले असून कार्यक्षेत्रातील नोंदणी झालेल्या सर्व उसाचे शंबर टक्के गाळप करण्यास आम्ही कटिबद्ध आहोत असे प्रतिपादन जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांनी केले. २०२५-२६ च्या गळीत हंगामासाठी जयभवानी सहकारी कारखान्याचे बॉयलर प्रदिपन करताना ते बोलत होते.



जयभवानी सहकारी साखर कारखान्याच्या २०२५-२६ च्या ४३ व्या गळीत हंगामाचा बॉयलर अग्नि प्रदिपन समारंभ रविवार दिनांक १२ ऑक्टोबर २०२५ रोजी श्रीक्षेत्र चाकरवाडी संस्थानचे मठाधिपती ह.भ.प. महंत महादेव महाराज यांच्या हस्ते व कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष शिवाजीराव (दादा)पंडित यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. यावेळी कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पान २ वर

## सावतामाळी मंदीर परिसरातील वाढती गुन्हेगारी रोखण्यासाठी सर्व अवैद्यधंदे तात्काळ बंद करा - राजकुमार डाके

परळी । प्रतीनीधी

शहरातील सावतामाळी मंदीर परिसरात वाढती गुन्हेगारी थांबवण्यासाठी सावता माळी मंदिर परिसरात सुरु असलेले सर्व अवैध धंदे तात्काळ बंद करुण या परिसरातील नागरीकांना भयमुक्त करावे अशी मागणी राजकुमार डाके यांच्यासह असंख्य सामाजीक कार्यकर्त्यांच्या वतीने संभाजी नगर पोलीस स्टेशनचे पोलीस नीरीक्षण मा. धनंजय ढोणे साहेब यांना प्रत्यक्ष भेटुन लेखी निवेदणा द्वारे करण्यात आली आहे.

गेल्या अनेक वर्षापासुन सावता माळी मंदीर परिसरातील कीर्ती नगर, कृष्णा नगर, गंगासागर नगर, सिध्देश्वर नगर या परिसरात अवैध धंद्याचा विळखा पडलेला आहे या अवैध धंद्यामुळे भावी पीढी व्यसनाच्या आहारी जाऊन गवैद्य मार्गाला लागत आहे.यातुनच देवीदास शिंदे आत्महत्या प्रकरण, अनेक मुलींना छेडछाड, शालेय विद्यार्थ्यांना मारहान सारखे अनेक गंभीर गुन्हे घडले आहेत. या गुन्हेगारी अपप्रवृत्तीला ना जात पात नसुन हि अपप्रवृत्ती आहे ती आलीकडच्या काळात या परिसरात प्रचंड प्रमाणात वाढलेली दीसत आहे.याच परिसरात अनेक शाळा, कॉलेज, गुरुकुलातुन हजाघरो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत येथील अवैद्य धंद्यामुळे तेथील अनेक विद्यार्थी त्यांच्या लहान वयातच वाईट व्यसनाच्या आहारी जात आहेत यातुन भांडणे, तंटे, वादविवाद, माता भगीणींची छेडछाड आदी प्रकार घडत आहेत. यातुन अनेकांचे संसार ऊद्धवस्त झाले असुन अनेक जणांनी आपले आयुष्य संपवल्याचे हि प्रकार घडले आहेत. लहान लहान मुले गुन्हेगारीकडे वळताना दिसत आहेत यातुन भावीपीढी ऊद्धवस्त होत आहे. हे सर्व प्रकार थांबवण्या साठी तात्काळ पान २ वर



## पूर परिस्थितीच्या कार्यकाळात पाटोदा तहसील प्रशासनाची उल्लेखनीय तत्परता

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या पूर परिस्थितीच्या कार्यकाळात तहसील प्रशासनाने अत्यंत जबाबदारी, संयम आणि तत्परतेने कार्य केल्याचे दिसून आले.

तहसीलदार दत्तात्रय निलावाड,नायब तहसीलदार मोरे साहेब,महसूल सहाय्यक खाडे मॅडम,सर्व तलाठी, मंडळ अधिकारी तसेच महसूल सेवक भाग्यश्री वीर यांनी आपले सर्व संसाधनांचा उपयोग करून नागरिकांच्या सुरक्षिततेस प्राधान्य दिले.पूरग्रस्त भागांचा सतत आढावा घेऊन मदतकार्य, पंचनामे, पान २ वर

## शिवसेनेची अंबाजोगाई-परळीत उद्या महत्त्वपूर्ण रणनीती बैठक

बीड । प्रतिनिधी

शिवसेनेचे मुख्य नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब खासदार श्रीकांत शिंदे साहेब सचिव संजय मोरे साहेब यांच्या आदेशाने तसेच मराठवाडा सचिव अशोक पटवर्धन साहेब संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे यांच्या सूचनेवरून आगामी नगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील प्रत्येक नगरपालिकेत भगवा फडकवण्याच्या ध्यासाने शिवसेनेने महत्त्वपूर्ण बैठक उद्या, १४ नोव्हेंबररोजी अंबाजोगाई आणि परळी येथे आयोजित केली आहे.



बैठकीत शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक राहून मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी प्रभाग निहाय उमेदवार , प्रचार योजना, जनसंपर्क अभियान आणि स्थानिक स्तरावरील रणनीतीवर सखोल चर्चा होईल. शिवसेना कार्यकर्त्यांनी जिल्ह्यातील प्रत्येक नगरपालिकेत भगवा फडकवण्याची तयारी पूर्ण ठेवावी, अशी मार्गदर्शक सूचना देखील या बैठकीत देण्यात येणार आहे. उद्या १४ ऑक्टोबर रोजी दुपारी २:०० वाजता परळी येथील येथील शासकीय विश्रामगृह येथे तर दुपारी ४:०० वाजता सावता माळी चौक ज्योती नगर आंबेजोगाई येथे बैठकीचे आयोजन केले आहे. ही बैठक आगामी नगरपालिका निवडणुकीत यश मिळवण्यासाठी निर्णायक ठरणार आहे. पक्षाची रणनीती ठरविण्यासोबतच कार्यकर्त्यांना संघटित करण्यावरही विशेष भर दिला जाणार आहे. बैठकीस शहरातील शिवसेनेचे सर्व पदाधिकारी अंगीकृत संघटना आजी-माजी लोकप्रतिनिधी व शिवसैनिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी केले आहे.

## मुर्शदपुरमध्ये रोखला बालविवाह

बीड । प्रतिनिधी

मुर्शदपुर या ठिकाणी अल्पवयीन मुलीचा बालविवाह होत आहे अशी माहिती आज सकाळी ११ वाजता राजर्षी छत्रपती शाहू महाराज प्रतिष्ठानला माहिती मिळाल्यानंतर तात्काळ पोलीस विभाग व सदरील गावचे ग्राम विकास अधिकारी यांच्याशी संपर्क साधून बालविवाह थांबवणे साठी सांगितले त्यानुसार सर्व माहिती घेऊन दुपारी पोलीस प्रशासन ग्रामविकास अधिकारी सामाजिक संस्थेचे प्रतिनिधी त्या ठिकाणी पोहोचल्यानंतर विवाहाची बालविवाहाची तयारी पूर्ण झाली होती त्या ठिकाणी उपस्थित असलेल्या नवरदेव नवरीच्या आई वडील इतर नातेवाईक यांचा पोलीस ग्रामसेवक सामाजिक कार्यकर्ते पोहोचल्यानंतर गोंधळ उडाला सर्वांनी धावपळ सुरू केली त्यानंतर आई-वडील व नातेवाईक यांना बोलवून घेऊन बालविवाह प्रतिबंधक कायदा २००६ याविषयी माहिती देण्यात आली बालविवाह मुळे मुलीच्या आरोग्यावर काय दुष्परिणाम होतात याबाबतची माहिती देण्यात आली त्यानंतर गावातील प्रतिष्ठित मंडळी ग्राम पंचायत चे पदाधिकारी या सर्वांना समजावून सांगण्यात आले त्यानंतर त्यांनी बालविवाह करणार नाही असे सांगितले तसे शपथपत्र सर्वांकडून लिहून घेण्यात आले मुलीच्या आई-वडिलांशी चर्चा केल्यानंतर सांगितले की आम्ही आता ऊसतोडीला जाणार आहोत व उचल ही घेतली पान २ वर



## आ.धस यांच्या प्रयत्नाने मुख्यमंत्री सहायता निधी व विविध शासकीय योजनांद्वारे अनेक रुग्णांना नवसंजीवनी

पाटोदा । प्रतिनीधी

दु:खात असलेल्या माणसाला आधार देणं, हेच खरं देवपूजेचं काम आहे, - या भावनेला मूर्त रूप देत आष्टी तालुक्यात गेल्या दोन दशकांपासून 'रुग्णसेवा' हेच आपले ध्येय मानून काम करणारे समाजसेवक विकास साळवे यांनी हजारो रुग्णांना जीवनदान दिलं आहे.



मराठवाडा भूषण, लोकनेते आ. सुरेश धस यांच्या प्रेरणेतून आणि माध्यमातून त्यांनी सामाजिक कार्याला नवा आयाम दिला आहे. गोर-गरीब, शेतकरी, मजूर, कामगार, आजारपणाच्या चक्रात सापडलेल्या कुठल्याही रुग्णाला मदत मिळावी म्हणून विकास साळवे हे नेहमी रात्री कितीही वाजता आ.सुरेश धस यांचा फोन आला की तात्पुरतेने पोहोचतात. आणि त्या रुग्णांची मदत करतात. मुख्यमंत्री सहायता निधी, पीएम निधी प्रधानमंत्री जनआरोग्य योजना (आयुष्यमान भारत), माझी कुटुंब माझी जबाबदारी, तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ गरजूंपर्यंत पोहोचवण्यासाठी त्यांनी अत्यंत तत्परतेने काम केलं आहे.

आ.सुरेश धस यांच्या अथक प्रयत्नांतून आतापर्यंत अनेक रुग्णांचे महागडे ऑपरेशन, हृदयविकार, किडनी, कर्करोग व व्हेंटिलेटर आवश्यकता असेलच तर आम्ही सोय करतात धर्मदाय रुग्णालयात बेड सवलती फायदा करून देतो गंभीर आजारांनी ग्रस्त असलेल्या लोकांना आर्थिक मदत मिळाली आहे. काही जणांना वेळेवर रक्त, औषधे, आणि रुग्णवाहिका सेवा उपलब्ध करून देत त्यांच्या कुटुंबाचे आयुष्य बदलले आहे. आ. सुरेश धस यांच्या माणुसकीच्या स्पर्शाने आणि त्यांच्याच मार्गदर्शनाखाली ही रुग्णसेवा मोहीम केवळ एक उपक्रम न राहता पान २ वर

## डॉ.विवेक राठोड अवार्डने सन्मानीत

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथिल बेस्ट हेअर ट्रान्सप्लाँट सेन्टरच्या विशेष योगदानाची दखल घेवुन संचालक डॉ.विवेक राठोड यांना सिने अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांच्या हस्ते हेल्थ केअर एक्सलन्स अँड लीडरशिप अवार्ड्स २०२५ देवुन सन्मानित करण्यात आले आहे.



वैद्यकीय क्षेत्रात शास्त्रशुध्द व शस्त्रक्रियेद्वारे हेअर ट्रान्सप्लाँट करणारी विश्वसनीय संस्था म्हणुन छ.संभाजीनगरच्या बेस्ट हेअर ट्रान्सप्लाँट ब्रँडने अल्पावधील नावलौकिक मिळवला आहे. बेस्टचे फाऊंडर व सीईओ डॉ.विवेक राठोड हे यापुर्वी एआयडीपी संस्थेचा मंत्री ना.आशिष शेलार यांच्या हस्ते आशिया पेसिफिक डेन्टल एक्सलन्स, मुंबई येथिल एसीई संस्थेचा सिने अभिनेत्री मलाईका अरोरा यांच्या हस्ते बेस्ट कॉस्मेटॉलॉजिस्ट व ट्रायकॉलॉजिस्ट पुरस्कार, लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड आणि सिने अभिनेते इम्रान हश्मी यांच्या हस्ते मिळालेल्या मिलेनियम ब्रिलियंस अवार्ड इत्यादी सन्मानाचे मानकरी ठरले असुन हेअर ट्रान्सप्लाँट आणि स्किन क्षेत्रातील त्यांचा अनुभव, व्यासंग, सेवाकार्य व योगदान मैलाचा दगड ठरले आहे. वैद्यकीय क्षेत्रातील प्रेरक नेतृत्व, रुणांप्रतीची बांधिलकी आणि विशेष योगदानाची दखल घेवुन डॉ.विवेक राठोड यांना आघाडीची सिने अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांच्या हस्ते पुणे येथे हेल्थ केअर एक्सलन्स अँड लीडरशिप अवार्ड्स २०२५ देवुन सन्मानीत करण्यात आले. छ.संभाजीनगरसह विमाननगर पुणे, अहिल्यानगर आणि चिखली (बुलढाना) येथे बेस्टच्या ब्रांच सेवारत असुन या चारही बेस्ट हेअर ट्रान्सप्लाँट सेन्टरमधुन त्वचेच्या सर्व समस्या, केसगळती, टक्कल किंवा केसांच्या समस्या असलेल्या रुग्णांना दिलासा मिळत आहे. डॉ.विवेक राठोड यांना मिळालेल्या सन्मानाबद्दल वैद्यकीय क्षेत्रातुन त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## दिंद्रुडच्या दक्षराज कटारेला विभागीय जलतरण स्पर्धेत सुवर्णपदक



दिंद्रुड । प्रतिनिधी

माजलगाव येथील सिंदफणा पब्लिक स्कूल माजलगावचा विद्यार्थी व तालुक्यातील दिंद्रुड येथील जलतरणपटू दक्षराज कटारे ने छत्रपती संभाजीनगर येथे संपन्न झालेल्या विभागीय जलतरण स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करून सुवर्ण पदक मिळवत सलग दुसऱ्यांदा राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्र झाला आहे.

चौदा पान २ वर

## पूरग्रस्तांच्या मदतीसाठी शिवसेनेचा संवेदनशील पुढाकार

गेवराई । प्रतिनिधी

तालुक्यातील गोगलगाव, गंगावाडी, बोरगाव, पांढरी, मिरगाव, माळस, पिपळगाव, सावळेश्वर, नागझरी आणि खामगाव या भागात आलेल्या पूरामुळे जनजीवन विस्कळीत झाले असताना, त्या संकटाच्या काळात शिवसेना डॉक्टर सेल ने पुढाकार घेऊन ''मानवतेची सेवा हीच खरी शिवसेवा'' या ब्रीदवाक्याची पुन्हा एकदा उजळणी केली आहे.



उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांच्या मदतीच्या हाताने आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे साहेब यांच्या आरोग्याचा वादा या संकल्पनेतून, पूरग्रस्त भागात मोफत वैद्यकीय सेवा व पशुवैद्यकीय मदत शिबिरांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाच्या मागे उभे असलेले प्रेरणादायी नेतृत्व म्हणजे डॉ. धनंजय पडवळ (प्रदेशाध्यक्ष, शिवसेना डॉक्टर सेल),डॉ. अमोल आंबेकर (महाराष्ट्र पान २ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायलयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# वारुळवाडीत बंद घर फोडून पाच लाखाचा ऐवज चोरीला चोरट्यांचा धुमाकूळ, सीसीटीव्ही फुटेजमध्ये चोरटे कैद

**नारायणगाव । प्रतिनिधी**

वारूळवाडी ग्रामपंचायत हद्दीतील महाविद्यालय रस्त्यालगत असलेल्या दोन सोसायटीमधील तीन बंद फ्लॅट अज्ञात चोरट्यांनी आज पहाटेच्या सुमारास फोडले. यापैकी एका बंद फ्लॅटचा दरवाजाचा कडी कोयंडा तोडून अज्ञात चोरट्यांनी फ्लॅटमधील कपाटात ठेवलेले ४७ ग्रॅम सोन्याचे दागिने, वीस हजार रुपयांची रोख रक्कम असा सुमारे पाच लाख रुपये किमतीचा ऐवज चोरून नेला.



चोरीच्या या घटनेची सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध झाले असून दुचाकी वरून आलेल्या दोन चोरट्यांनी ही चोरी केल्याचे निष्पन्न झाले आहे. या प्रकरणी नवनाथ नलावडे यांनी नारायणगाव पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. मात्र पोलीस स्टेशनच्या सर्व्हरला प्रॉब्लेम असल्याने फिर्याद दाखल झाली नाही. पोलिसांनीफिर्याद दाखल करण्यासाठी नंतर येण्यास सांगितले आहे. अशी माहिती निखिल नलावडे यांनी दिली.

नवनाथ नलावडे हे वारुळवाडी येथील महाविद्यालया कडे जाणाऱ्या रस्त्यालगत असलेल्या साईनाथ सोसायटी मध्ये राहतात. फ्लॅटला कुलूप लावून शनिवारी ते गावी धोलवड येथे गेले होते. आज पहाटे साडेतीन वाजण्याच्या सुमारास दोन अज्ञात चोरट्यांनी बंद फ्लॅटचा दरवाजा तोडून कपाटातील मंगळसूत्र,चैन, कानातील वेल, टॉप आदी ४७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व वीस हजार रुपयांची रोकड चोरून नेली. चोरी झाल्याची माहिती आज सकाळी नलावडे यांना समजली त्यानंतर ते धोलवड येथून नारायणगाव येथे आले. नारायणगाव पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी गेल्यानंतर सर्व्हर डाऊन झाला आहे. नंतर या असे त्यांना सांगण्यात आले.

याच सोसायटीमधील निलेश नलावडे व कुबेर सोसायटीमधील नरेश पारवे यांचा असे दोन बंद फ्लॅटचा दरवाजाचा कडी कोयंडा तोडून चोरट्यांनी चोरी करण्याचा प्रयत्न केला.मात्र या फ्लॅटमध्ये कोणी राहण्यास नसल्याने चोरट्यांचा प्लॅन फसला. पादचारी महिलेचे मंगळसूत्र लांबवले: शनिवारी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास आनंदवाडी येथील उज्वला पाटोळे या पादचारी महिला पुणे नाशिक महामार्गाने निघाल्या होत्या.नारायणगाव बस स्थानकाजवळ मोटरसायकलवर आलेल्या दोन जणांपैकी मागे बसलेल्या एकाने उज्वला पाटोळे यांच्या गळ्यातील १४ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र हिसका मारून चोरून नेले. त्यानंतर चोरटे आळेफाट्याच्या दिशेने वेगात गेले. याप्रकरणी नारायणगाव पोलीस ठाण्यात पाटोळे यांनी तक्रार दिली आहे.नारायणगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक महादेव शेलार यांची बदली झाली असून त्यांच्या जागी प्रवीण सपंगे यांनी पदभार स्वीकारला आहे.सपंगे यांनी पदभार स्वीकारताच पोलीस ठाण्याच्या जवळच असलेल्या सोसायटीमध्ये चोरी झाल्याने चोरट्यांनी नवीन अधिकाऱ्याचे चोरी करून स्वागत केले असल्याची नागरिकांमध्ये चर्चा सुरू आहे.

# यावर्षी पवार कुटुंब बारामतीत दिवाळी साजरी करणार नाही

बारामती । प्रतिनिधी

दरवर्षी मोठ्या उत्साहात पवार कुटुंब बारामतीत दिवाळी (इरीरारींळ ऊुरश्रळ) सण साजरा करत असते. या सणाच्या दिवशी पवार कुटुंबातील सर्व व्यक्ती एकत्र येत असतात. पण यावर्षी बारामतीमध्ये पवार कुटुंबीयांकडे दिवाळी पाडवा साजरा होणार नाही. कारण, या वर्षी शरद पवार यांचे बंधू प्रतापराव पवार यांच्या पत्नी भारती प्रतापराव पवार यांचं निधन झालं आहे. त्यामुळे पवार कुटुंबीयांनी दिवाळी साजरी न करण्याचा निर्णय घेतला आहे.



शरद पवार आणि त्यांच्या संपूर्ण कुटुंबीयांनी यंदा दिवाळी साजरी न करण्याचा निर्णय घेतला आहे. या वर्षी प्रतापराव पवार यांच्या पत्नी भारती पवार यांचं निधन झाल्यामुळे पवार कुटुंबीयांनी दिवाळी साजरी न करण्याचा निर्णय घेतला आहे. बारामतीत दरवर्षी पवारांचा दिवाळी पाडवा हा मोठ्या जल्लोषात साजरा होत असतो. या पाडव्याचं कुतूहल राज्याच्या कानाकोपऱ्यासह देशभरातील पवार प्रेमींमध्ये असते. या पाडव्याला पवारांना भेटण्यासाठी राज्यभरातून विविध राजकीय पक्षातील आमदार, खासदार यांच्यासह राज्याच्या कानाकोपऱ्यातील नागरिक बारामतीकडे पवारांना शुभेच्छा देण्यासाठी येत असतात. मात्र यंदाचा पाडवा होणार की नाही? याबाबत खासदार सुप्रिया सुळे यांनी साशंकता व्यक्त केली होती. अशातच दिवाळी साजरी न करण्याचा निर्णय पवार कुटुंबाने घेतला आहे.

दरवर्षी बारामतीच्या गोविंद बागेत पवारांचा दिवाळी पाडवा संपन्न होत असतो. मात्र, गेल्या वर्षीचा दिवाळी पाडवा हा राजकीय वर्तुळातील चर्चेचा विषय झाला होता. कारण पक्ष आणि कुटुंबात फूट पडल्यानंतर पवारांच्या पाडव्यामध्येही फूट पडल्याचा पाहायला मिळालं होतं. शरद पवारांचा पाडवा गोविंदबागेत तर अजित पवारांचा पाडवा काटेवाडीत साजरा झाला. त्यामुळं नात्यानंतर सणातही फूट पडल्याचे दिसून आले होते. शरद पवारांना भेटण्यासाठी गोविंद बागेत मोठ्या संख्येनं कार्यकर्ते आले होते. तर अजित पवारांना भेटण्यासाठी देखील कार्यकर्त्यांनी गर्दी केली होती. अजित पवार त्यांच्या पत्नी खासदार सुनेत्रा पवार, अजित पवारांचे पुत्र पार्थ पवार, जय पवार कार्यकर्त्यांच्या शुभेच्छांचा स्विकार केला होता.

# हल्ल्याच्या निषेधार्थ पोलिस ठाण्यात आंदोलन

विश्रांतवाडी । प्रतिनिधी

सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर झालेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ विश्रांतवाडी येथे फुले-शाहू-आंबेडकरी विचारधारेच्या संस्था, संघटना व कार्यकर्ते यांच्यावतीने निषेध आंदोलन करण्यात आले. शिवसेना उपनेत्या व आंबेडकरी विचारवंत सुषमा अंधारे, आमदार बापू पठारे उपस्थित होते. सरन्यायाधीश गवई यांच्यावर हल्ला करणाऱ्या राकेश तिवारी या व्यक्तीवर देशद्रोहाचा तात्काळ गुन्हा दाखल करावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. राकेश तिवारी यांच्या प्रतिमेला जोडे मारून निषेध व्यक्त करण्यात आला. गुन्हा दाखल करण्यात यावा, या मागणीसाठी आंदोलनकर्त्यांनी पोलिस ठाण्याच्या आवारात ठिय्या आंदोलन करत पोलिसांकडे हात जोडून विनंती केली. यावेळी पोलिस निरीक्षक दत्ताराम बागवे म्हणाले, "गुन्हा दाखल करता येणार नाही. आपण निवेदन द्यावे."

विश्रांतवाडी पोलिसांनी तक्रार दाखल करून घ्यावी व ती पुढील तपासासाठी वर्ग करण्यात यावी, अशी आंदोलनकर्त्यांची मागणी होती. आंदोलनकर्त्यांचे निवेदन स्वीकारून त्यावर वरिष्ठांचे मार्गदर्शन घेऊन गुन्हे दाखल करण्याची तजवीज ठेवली आहे, असे लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलनकर्त्यांनी माघार घेतली. आंदोलनाचे संयोजन सचिन भोसले व निखिल गायकवाड यांनी केले. माजी उपमहापौर डॉ. सिद्धार्थ धेंडे, माजी नगरसेवक सागर माळकर, भैयासाहेब जाधव, ॲड. अयुब शेख, संग्राम रोहम, डॉ. पवन सोनावणे, सुभाष ठोकळे, सुदर्शन चखाले, ॲड. नानासाहेब नलावडे आदी उपस्थित होते.

# फक्त सहा टक्के मतं कमी केली की तुमचं सरकार गडगडणार, महादेव जानकरांचा इशारा

बारामती । प्रतिनिधी

काँग्रेसला वाटत होतं या राज्यातील सत्ता जाणार नाही पण घालवणारे आम्हीच होतो असे मत राष्ट्रीय समाज पक्षाचे प्रमुख महादेव जानकर यांनी व्यक्त केले. आता जरी ह्या मुख्यमंत्र्यांना वाटत असेल आमच्या सरकारचं कोणी काय करु शकत नाही, तर याद राखा. आम्ही दोघं (बच्चू कडू आणि महादेव जानकर) महाराष्ट्रभर फिरतोय. तुमची सहा टक्के जर मत कमी केली तर तुमचं सरकार गडगडल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा जानकर यांनी सरकारला दिला.



येत्या २३ किंवा २४ तारखेला आम्ही सांगोल्याला एक मोठी परिषद घेणार आहोत. ३० ते ३५ हजार लोक जमतील याचा बंदोबस्त करत असल्याचे मत राष्ट्रीय समाज पक्षाचे प्रमुख महादेव जानकर यांनी व्यक्त केले. स्वाभिमानी शेतकरी संघटना, प्रहार, रासप आम्ही ताकद दाखवली आहे. माणसं कमी असतील. आम्ही पाच माणसांपासून सरकार बदललीत त्यामुळं काळजी करण्याचं कारण नाही असे जानकर म्हणाले. मी आणि बच्चू भाऊ काल चंद्रपूरला होतो, आम्ही रात्रीचा प्रवास करून आलो आहे. बिलकुल खचून जाण्याचं काम नाही असे जानकर म्हणाले. भल्या भल्याचं सरकार आम्ही उलटी केली आहेत. त्यामुळे ह्यांचं पण उलटायला वेळ लागणार नाही. पण तुम्ही जागे व्हा ही विनंती करण्यासाठी आम्ही तुमच्याकडे आलोय असे जानकर म्हणाले. मुख्यमंत्री विधानसभेत मोठी मोठी भाषण करत होते, आम्ही शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करु, कोरा कोरा कोरा असे म्हणत होते. आपण अभ्यास करा पण सातबारा कोरा झाला का? त्याचं चिंतन करा. आम्ही ३१ जिल्ह्यात बांधावर जाऊन आलो आहे. एसीत बसलो नाही असे जानकर म्हणाले.

लोकांमध्ये फिरण्याचं काम जाग करण्याचं काम आम्ही करतोय. ते इलेक्शनच्या वेळेस मत मागण्यासाठी येतात गोड गोड बोलतात. दुधाला दर ऊसाला दर कापसाला दर द्या म्हणलं तर ते तयार नसतात. यांचं कुठं आपण चिंतन आणि म्हणन करावं. ह्या सरकारनं शेतकऱ्यांच्या नावावर मत घेऊन राज्य भरले आहे. सोयाबीन एकर लावायचं असेल तर २२ हजार रुपये खर्च येतो. काल सरकार साडेआठ हजार रुपये देतो म्हणाले. २२००० खर्च येतो साडेआठ हजार देतो म्हणाले. एकर जमीन जर नदीकाठची वाहून गेली तर भरण्यासाठी सहा लाख खर्च येतो, या सरकारने ४७ हजार रुपये दिले आहेत, असे म्हणत जानकरांनी सरकारवर टीका केली. पश्चिम महाराष्ट्रातील नेते ढगे झाले शेतकरी भिकारी झाले आहेत. ज्या तालुक्याचा आमदार प्रत्येक ५ वर्षाला बदलतो तो तालुका हुशार असल्याचे जानकर म्हणाले. ज्या तालुक्याचा आमदार ३५ वर्षे राहतो तो तालुका गुलाम असेही जानकर म्हणाले. मी दूध विकास मंत्री होतो तेव्हा सर्वात जास्त दुधाला दर भारतात मी दिला होता. तुमचं दुःख आहे ते आमचं दुःख आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात दुष्काळ पडला होता तेव्हा महाराजांनी सगळ्यांचा पगार बंद केला होता. जनतेला सुखी ठेवण्याचं काम केलं होतं. आत्ताच सरकार शिवरायांचे नाव घेते आणि राज्य कोणाचं चालवतोय असे जानकर म्हणाले.

# चौपन्न फाटा येथे अपघातात वृद्धाचा मृत्यू, पत्नी गंभीर जखमी

शेळगाव : इंदापूर-बारामती श्री संत तुकाराम महाराज पालखी महामार्गावरील चौपन्न फाटा (ता. इंदापूर) येथे रविवारी (दि. १२) दुपारी चारचाकी व मोटार सायकलचा झालेल्या अपघातात मोटर सायकलस्वार ७७ वर्षीय वृद्धाचा मृत्यू झाला, तर त्यांच्या पत्नी गंभीर जखमी झाल्या आहेत. त्यांना उपचारासाठी बारामती येथे रुग्णालयात दाखल केले आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, इंदापूर-बारामती संत तुकाराम महाराज पालखी मार्गावरील चौपन्न फाटा पेट्रोलपंपानजीक रविवारी दुपारी दोन वाजण्यास सुमारास बारामतीकडून आलेल्या चारचाकी गाडीचा व मोटरसायकलचा अपघात झाला. यामध्ये घोरपडवाडी (ता. इंदापूर) येथील तानाजी पांडुरंग झेलमर (माळी) यांचा मृत्यू झाला असून त्यांच्या पत्नी कमल तानाजी झेलमर (माळी) या गंभीर जखमी झाल्या आहेत. त्यांना उपचारासाठी बारामती येथे दाखल करण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळताच वालचंदनगर पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला.

# पोटगी न भरणाऱ्या पतीला न्यायालयाचा दणका; कुटुंबीयांची मालमत्ता जप्त करण्याचा आदेश

पुणे : कौटुंबिक हिंसाचाराच्या गुन्ह्यात पोटगीसह नुकसान भरपाईचे आदेश देऊनही ते देण्यास टाळाटाळ करणाऱ्या पतीला न्यायालयाने दणका दिला आहे. पतीसह कुटुंबीयांची मालमत्ता शोधून ती ताब्यात घेण्याचे आदेश न्यायालयाने नुकतेच दिले आहे.



जय आणि ललिता (दोघांचीही नावे बदललेली आहेत) अशी पती आणि पत्नीचे नाव आहे. कौटुंबिक हिंसाचाराप्रकरणी ललिता हिने जय विरोधात ९ मार्च २०२१ रोजी न्यायालयात धाव घेतली होती. सुनावणी दरम्यान जय न्यायालयात हजर न राहिल्याने त्याच्या विरोधात न्यायालयाने एकतर्फी आदेश दिला. त्यामध्ये, पतीसह कुटुंबीयांनी ललिता हिस पोटगीसह नुकसानभरपाई म्हणून ४० हजार रुपये तर खर्चापोटी ५ हजार रुपये देण्याचे आदेश देण्यात आले. न्यायालयाच्या आदेशानानंतरही पोटगी तसेच नुकसान भरपाई न मिळाल्याने ललिता हिने ड. पुष्कर पाटील, ड. ऋतुराज पासलकर आणि ड. प्रतीक पाटील यांमार्फत न्यायालयात धाव घेतली. या वेळी, तिने पती व कुटुंबीयांविरोधात दरखास्त दाखल केली. त्यानंतरही कोणी हजर न राहिल्याने त्यांनी अटकावणी अधिपत्र (डिस्ट्रेस वॉरंट) काढण्यासाठी अर्ज केला. न्यायालयाने तो मंजूर केला. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण या कायद्यांतर्गत अटकावणी अधिपत्र (डिस्ट्रेस वॉरंट) द्वारे न्यायालय पोलिसांद्वारे पुढील पाऊल उचलते. ज्यामध्ये, पतीने किंवा विरुद्ध पक्षातील कोणीही पोटगी किंवा इतर रकमेचा भरणा केला नाही, तर त्यांच्या मालमत्ता जप्त करून देयके वसूल केली जातात. सदर आदेशाची अंमलबजावणी करून विरुद्ध पक्षाच्या मालमत्तांबाबत पाहणी करून त्या ताब्यात घेऊन ते जप्त करण्याचे अधिकार पोलिसांना असतात.

# बिबट्याच्या हल्ल्यात साडेपाच वर्षांच्या शिवन्याचा मृत्यू; पिंपरखेड हादरले

शिरूर । प्रतिनिधी

शिरूर तालुक्यातील पिंपरखेड गावात रविवारी (दि. १२) सकाळी एक अत्यंत दुर्दैवी आणि हृदयद्रावक घटना घडली आहे. भरदिवसा बिबट्याने केलेल्या अचानक हल्ल्यात शिवन्या शैलेश बोंबे या साडेपाच वर्षांच्या लहान मुलीचा मृत्यू झाला. ही घटना सकाळी पावणे दहाच्या सुमारास घडली असून, यामुळे संपूर्ण पिंपरखेड आणि परिसरातील नागरिकांमध्ये मोठी दहशत पसरली आहे. बिबट्याच्या वाढत्या हल्ल्यांमुळे नागरिकांचे जीवन धोक्यात आले असून, वनविभागाने या हिंस्र पशूचा त्वरित बंदोबस्त करावा, अशी तीव्र मागणी आता जोर धरू लागली आहे.

पिंपरखेड येथील शेतकरी अरुण देवराम बोंबे यांच्या घरामागे त्यांच्या शेतात जेसीबीचे काम चालू होते. या कामाच्या ठिकाणी त्यांचे नात शिवन्या शैलेश बोंबे ही आजोबा अरुण बोंबे यांना पिण्यासाठी पाणी घेऊन जात होती. घरापासून जवळच असलेल्या एका चार फूट उंचीच्या ऊसाच्या शेतात एक बिबट्या दबा धरून बसला होता. शिवन्या पाणी घेऊन जात असतानाच, दबा धरून बसलेल्या त्या बिबट्याने अचानक तिच्यावर जोरदार झडप घातली. बिबट्याने शिवन्याला तोंडात पकडले आणि तो तातडीने ऊसाच्या शेतात शिरला. सुमारे २०० फूट अंतरावर असलेल्या आजोबा अरुण देवराम बोंबे यांनी हा थरार पाहिला. आपल्या चिमुकल्या नातीवर बिबट्याने हल्ला केल्याचे पाहताच, क्षणाचाही विलंब न लावता ते जीवाच्या आकांताने बिबट्याच्या दिशेने धावले. जीवाची पर्वा न करता अरुण बोंबे यांनी ऊसात शिरलेल्या बिबट्याच्या दिशेने धाव घेतली आणि मोठ्या हिंमतीने बिबट्याच्या तावडीतून शिवन्याला सोडवले .बिबट्याच्या हल्ल्यात शिवन्या गंभीर जखमी झाली होती. तिला तातडीने उपचारासाठी मंचर येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, दुर्दैवाने उपचारापूर्वीच तिचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले.



या घटनेमुळे बोंबे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी रुग्णालयात मोठी गर्दी केली होती. तसेच, या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन माजी सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील आणि माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी देखील उपजिल्हा रुग्णालयात धाव घेतली. त्यांनी घटनेची माहिती घेऊन बोंबे कुटुंबाचे सांत्वन केले आणि प्रशासनाला आवश्यक त्या सूचना दिल्या.

परिसरातील सातवी घटना

पिंपरखेड आणि जांबूत या साधारण १० किलोमीटरच्या परिसरात बिबट्याच्या हल्ल्यात मनुष्यहानी झाल्याची ही सातवी घटना आहे. बिबट्या आता माणसांना घाबरत नसून भरदिवसा हल्ले करत असल्यामुळे या परिसरातील नागरिकांना सध्या अक्षरशः जीव मुठीत धरून जगावे लागत आहे. शेतीत काम करणे, बाहेर फिरणे किंवा मुलांना शाळेत पाठवणेही धोक्याचे झाले आहे. या जीवघेण्या परिस्थितीमुळे नागरिक प्रचंड भयभीत झाले आहेत. त्यामुळे, या नरभक्षक किंवा हिंस्र झालेल्या बिबट्याचा त्वरित शोध घेऊन त्याला पकडावे किंवा त्याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी वनविभागाकडे केली जात आहे. बिबट्यांच्या सततच्या हल्ल्यांमुळे वनविभागाच्या कार्यक्षमतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण असून, प्रशासनाने या गंभीर समस्येकडे त्वरित लक्ष देणे गरजेचे आहे.

# बीएमआर कंपनीतील लेबर कॉन्ट्रॅक्टच्या वादातून चालकावर जीवघेणा हल्ला! ३ जणांवर गुन्हा दाखल

शिरूर । प्रतिनिधी

बीएमआर कंपनीतील लेबर कॉन्ट्रॅक्टच्या वादातून एका तरुण चालकावर जीवघेणा हल्ला झाल्याची धक्कादायक घटना शिरूर बायपासवरील महाजन मळा परिसरात उघडकीस आली आहे. या घटनेत वैभव बाळासाहेब काळे (वय २२, रा. कडूस, ता. पारनेर, जि. अहमदनगर) हा युवक गंभीर जखमी झाला असून, शिरूर पोलिसांनी तीन आरोपींविरुद्ध गंभीर गुन्हा दाखल केला आहे.

वैभव काळे हा कारेगाव एस-इन चौकातून बीएमआर कंपनीत जाणाऱ्या कामगारांना घेऊन पुणे-अहमदनगर महामार्गावर जात असताना, शिरूरमधील संग्राम हॉटेलसमोर पांढऱ्या रंगाची ग्लांझा (MH-12-VC-9887) ही कार आडवी लावून त्याचा मार्ग रोखण्यात आला. त्या गाडीतून दोन इसम खाली उतरले. एकाने गुलाबी रंगाचा टी-शर्ट व काळी हाफ पॅन्ट, तर दुसऱ्याने काळ्या रंगाचा फुल बाह्यांचा शर्ट व पॅन्ट घातलेली होती. त्यांनी वैभव काळे याला गाडीतून खाली ओढून शिवीगाळ, दमदाटी करत लाथाबुक्यांनी बेदम मारहाण केली. त्यानंतर गुलाबी टी-शर्टधारी इसमाने गाडीमधून लोखंडी रॉड काढून काळे यांच्या गाडीची समोरील काच फोडली. यानंतर तिघांनी मिळून काळे याचा पाठलाग करून शिरूर बायपासवरील महाजन मळा परिसरात गाडी थांबवली. तेथे लाल रंगाची टोपी असलेला हुडी परिधान केलेला तिसरा इसम आला. या तिघांनी मिळून काळे व त्याच्या सोबत असलेल्या कामगारांना दम देत म्हटले, बीएमआर कंपनीमध्ये आधी आमचा कॉन्ट्रॅक्ट होता. तुम्ही कळमकरच्या कॉन्ट्रॅक्टखाली काम करता, ते मी बघतोच! असे म्हणत त्यांनी काळे याला हाताने व लाथाबुक्यांनी मारहाण करून खाली पाडले. त्यानंतर गुलाबी शर्टधारी इसमाने रॉडने काळे यांच्या डाव्या पायावर तीन ते चार वेळा जोरात वार केले. या हल्ल्यात त्यांचा डावा पाय मोडला असून पाठ, छाती आणि हातांवर जखमा झाल्या आहेत. पुन्हा इकडे गाडी भरायला आलास तर जिवंत सोडणार नाही, अशी धमकी देत आरोपींनी गाडीच्या सर्व काचा फोडून मोठे नुकसान केले. जखमी वैभव काळे याला त्याचा चुलत भाऊ सौरभ काळे याने विघ्नहर्ता हॉस्पिटल, शिरूर येथे दाखल केले. डॉक्टरांनी त्याचा पाय मोडल्याचे व अंगावर मार लागल्याचे निदर्शनास आणले आहे.

या प्रकरणी संदीप दळवी, सोन्या गव्हाणे,अक्षय पवार सर्व रा. आण्णापूर, ता. शिरूर या आरोपींची ओळख पटली आहे. या प्रकरणी शिरूर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास अंमलदार पो.हवा कळमकर हे पुढील तपास करत आहे.लेबर कॉन्ट्रॅक्टच्या वादातून हा हल्ला झाला असल्याची प्राथमिक माहिती पोलिसांनी दिली आहे. जखमी वैभव काळे याचा विघ्नहर्ता हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू असून, शिरूर पोलिसांकडून आरोपींच्या शोधासाठी विशेष पथक कार्यरत आहे.

# संग्राम जगताप यांचं वक्तव्य पक्षाच्या विचारधारेला धरुन नाही, याबाबत नोटीस काढली -अजित पवार

**पुणे । प्रतिनिधी**

आमदार संग्राम जगताप यांनी केलेलं वक्तव्य हे पक्षाच्या विचारधारेला धरुन नसल्याचे वक्तव्य राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले. याबद्दल आम्हाला नोटीस काढावी लागेल, असं मी सांगितलं होतं. त्या पद्धतीने नोटीस काढली असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले. शेवटी तुम्ही एका राजकीय पक्षाचे सदस्य असाल, सभासद असाल तर त्या पक्षाच्या विचारधारेबद्दल काहीही बोलायला लागला तर कोणताही पक्ष सहन करणार नाही असे अजित पवार म्हणाले.



दिलेल्या नोटीसला उत्तर आल्यानंतर निर्णय घेऊ

नोटीस काढल्यावर त्याला प्रक्रिया असते. त्या नोटीसला काय उत्तर येते ते उत्तर आल्यानंतर आम्ही निर्णय घेऊ असे अजित पवार म्हणाले. पूरग्रस्त भागात मोठ्या लहान उसाचे नुकसान झाले आहे. त्यासंदर्भात पुढची कार्यवाही काय करायची याची माहिती देण्यात आली आहे. साखर कारखान्यांना याबाबतची सर्व माहिती दिली जाणार आहे. कुठलाही निर्णय झाला तरी वेगवेगळे मतप्रवाह असतात. दरम्यान, दिवाळच्या आधी शेतकऱ्यांना मदत देणार असल्याचे अजित पवार म्हणाले. मी उद्या मुंबईला जाणार आहे. उद्या मुख्य सचिवांची भेट घेणार आहे. ज्या पूरग्रस्त भागातील अहवाल आले आहेत, त्याबाबत आम्ही निर्णय घेऊ असे अजित पवार म्हणाले.

अहिल्यानगरमध्ये गुरुवारी एमआयएम पक्षाचे प्रमुख खासदार असदुद्दीन ओवैसी यांची जाहीर सभा झाली. या सभेत एमआयएमचे नेते आणि माजी खासदार इम्तियाज जलील यांनी आमदार संग्राम जगताप यांच्यावर टीकेची झोड उठवली. आधी एक छोटासा चिंटू होता, आता चिकणी चमेली आली आहे, असे म्हणत संग्राम जगताप यांच्यावर अप्रत्यक्षपणे टीका केली होती. त्यानंतर हिंद जन आक्रोश मोर्चात संग्राम जगताप यांनी मोर्चाला आवाहन करताना दिवाळीची खरेदी हिंदूंकडून करण्याची विनंती केली आहे. येणाऱ्या दिपावली सणाच्या निमित्ताने प्रत्येक नागरिकांनी खरेदी फक्त हिंदू लोकांच्याच दुकानातून करावी. आपल्या दीपावली खरेदीचा नफा केवळ हिंदू लोकांनाच मिळायला हवा, असेही त्यांनी म्हटले.